**Report of the Legal Aid Clinic**

2019-20

A free Legal Aid Clinic was initiated in collaboration with District Legal Aid Committee, Dhule by the College. The Clinic was inaugurated on the 22nd January 2019. The clinic provides free legal services and legal awareness to the marginalized sections of society, the rural residents, women and children, and senior citizens. The Clinic was inaugurated by Smt. Mangala Dhote , Principal District Judge, Dhule, Shri. Shaikh J.A., Secretary, DLSA, Dhule, Dr. Jalindar Adsule, Principal Dr. Babasaheb Ambedkar College of Social Work and Shri Kiran Ahirao, the local Corporator. This is the only legal aid clinic in Dhule which has been started in a non- law College. This service was started in the College due to credibility that the college has established in reaching out to the marginalized and its social commitment.

The Clinic runs on every Thursday from 9.00 am to 1.00 pm. An advocate has been appointed for the clinic by the District Legal Aid Committee. The Clinic did not operate from May 2019 to January 2019 as the Court has vacations in May and June and then subsequently the Secretary of the District Legal Aid Authority was transferred and hence the process of re-starting the Clinic took time. The Clinic ran for a total of five months. The clinic strives to reach the poor and needy sections of the society who do not have access to legal services.

The Clinic started functioning from 7th February 2019. A list of beneficiaries who have availed the benefit of free legal advice is as follows:

1. Subhash Sukhdev Bhil
2. Sarubai Sahadu Thakare
3. Tushar Bhagwan Jadhava
4. Mangalabai Barku Koli
5. Asha Bhagwan Thorat
6. Dipali Sopan Chandanshive
7. Sunita Patil
8. Laxman Gulab Pawar
9. Sarla Abhiman Deore
10. Ganesh Sunil Uphade
11. Jane Chetna Shrikant
12. Vaishali Vijay Pardhi

Samata Shikshan Sanstha, Pune's Dr. Babasaheb Ambedkar College of Social Work, Morane, Dhule (M.S.) ★

DR.JALINDAR ADSULE
PRINCIPAL
Samata Shikshan Sanstha,Pune's
Dr.Babasaheb Ambedkar College of
Social Works,Morane(Nakane)
Tal. & Dist.Dhule (M.S.) - 42400

It is a great pleasure to inform all the teachers and non-teaching staff of the college that even though the college has provided meals at a very low price of Rs. 30, the interested teachers and non-teaching staff should take advantage of this.

Dr. Babasaheb Ambedkar College of Social Work, Morane, Dhule (M.S.) ★ Samata Shikshan Sanstha, Pune's

DR.JALINDAR ADSULE
PRINCIPAL
Samata Shikshan Sanstha,Pune's
Dr.Babasaheb Ambedkar College of
Social Works,Morane(Nakane)
Tal. & Dist.Dhule (M.S.) - 42400



समता शिक्षण संस्था, पुणे संचलित,

डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजकार्य महाविद्यालय, मोराणे ता.जि. धुळे.

## *भारतीय संविधान वाचन सप्ताह कार्यक्रम अहवाल २०१५-१६*

*दिनांक - १८/०१/२०१६*

❖ **प्रस्तावना :-**

समता शिक्षण संस्था, पुणे संचलित, डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजकार्य महाविद्यालय, मोराणे ता.जि. धुळे. येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १२५ वी जयंती निमित्त ग्रंथालयामार्फत भारतीय संविधान वाचन सप्ताहाचे अयोजन करण्यात आले असुन आज दिनांक १८/०१/२०१६ वार सोमवार रोजी संविधान वाचन सप्ताहाचे उद्‌घाटन करण्यात आले.

सदर उद्‌घाटन कार्यक्रमाची सुरुवात सकळी ९:०० वाजता करण्यात आली. तसेच कार्यक्रमास लाभलेले उद्‌घाटक मा.न्या.विवेक बी. गव्हाणे (सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण विभाग), कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा.डॉ.जालिंदर अडसुळे, प्रमुख पाहुणे मा.प्रा.लिलाधर पाटील, ॲड. विशाल साळवे, मा.एम.बी.भट सर आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्र संचालन प्रा.प्रीती वहाणे यांनी केले आणि दिपप्रज्वलन तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पुजन करुन कार्य क्रमाचे उद्‌घाटन करण्यात आले तसेच उद्‌घाटक व प्रमुख पाहुण्यांचे परिचय करुन स्वागताचा कार्यक्रम पार पाडण्यात आला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला भारतीय संविधान वाचन सप्ताह कार्यक्रमाचे प्रास्तविक ग्रंथपाल गजेंद्र जगेदव यांनी केले. स्वागताच्या कार्यक्रम संपल्यानंतर मार्गदर्शनासाठी उद्‌घाटनास मा. न्या. विवेक बी. गव्हाणे यांना आमंत्रीत करण्यात आले.

उद्‌घाटकांनी राज्यघटनेचा इतिहास, राज्यघटना कशी अस्तित्वात आली, उद्देशिकेचे वाचन घेण्यात आलेली तत्वे, कर्तव्ये इत्यादी मुद्यांवर मार्गदर्शन केले.

❖ **प्रमुख पाहुणे :- मा. प्रा. लिलाधर पाटील सर (धनादाई मात कला महा. अमळनेर)**

प्रमुख पाहुण्यांनी मार्गदर्शनात घटना निर्मिती, मुलभूत तत्वे, राज्य घटना येण्याच्या आगोदर मनुस्मृतीची राज्यघटना होती, कल १३ मनुस्मृती जाळण्याविषयीचा उल्लेख, मनुस्मृतीच्या नियमावली भर देण्यात आला, राज्यघटनेत १० खंड आणि १२,००० पाने आहेत. संसदेत राज्यघटनेवर ३६ तास चर्चा करण्यात आली. तसेच हिंदु कोड बिल, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला मंत्रीमंडळाचा राजीनामा, अनु. जाती -जमार्तीना देण्यात आलेला मतदानाचा अधिकार इत्यादी मुद्यांवर प्रमुख पाहुण्यांनी मार्गदर्शन केले.

❖ **कार्यक्रमाचे अध्यक्ष :- प्रा. डॉ. जालिंदर अडसुळे**

अध्यक्षीय भाषणात ४२ वी घटनादुरुस्ती, मुलभूत हक्क, समानतेचा हक्क या मुद्यांवर अध्यक्षीय भाषण हे करण्यात आले आणि अध्यक्षीय समारोप हा करण्यात आला. शेवटी ग्रंथालयाचे कर्मचारी श्री. सुभाष बागुल यांनी आलेल्या मान्यवरांचे आभार मानले आणि कार्यक्रमाचा शेवट हा अध्यक्षांच्या परवानगीने करण्यात आला. सदरील कार्यक्रमास सर्व विद्यार्थ्यांनी उत्स्फुर्तपणे सहभाग नोंदविला.

## दिनांक - १९/०१/२०१६

❖ **प्रस्तावना :-**

समता शिक्षण संस्था, पुणे संचलित, डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजकार्य महाविद्यालय, मोराणे ता.जि. धुळे. येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १२५ वी जयंती निमित्त ग्रंथालयामार्फत भारतीय संविधान वाचन सप्ताह अयोजित करण्यात आला असुन आज दिनांक १९/०१/२०१६ वार मंगळवार असुन कार्यक्रमाचा दुसरा दिवस तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विविध पैलु या विषयावर मार्गदर्शन करण्यात आले.

सदर कार्यक्रमाला सुरुवात ही दु. २:०० वाजता झाली असुन प्रमुख वक्ते म्हणुन एस.एन.डी.टी. महाविद्याल, धुळे येथील मराठी विभागाचे प्रमुख डॉ. विनोद उपर्वट हे लाभले तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा.डॉ.सुवर्णा बरडे आणि प्रमुख पाहुणे म्हणुन प्रा.डॉ.जालिंदर अडसुळे सर तसेच ग्रंथपाल गजेंद्र जगदेव हे उपस्थित होते. सर्वप्रथम डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पुजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले आणि प्रमुख वक्त्यांचा परिचय करण्यात आला. त्याचबरोबर आलेल्या मान्यवरांचे स्वागत भारताचे संविधान आणि पुष्पगुच्छ देवुन ग्रंथपालांनी स्वागत केले.

स्वागताचा कार्यक्रम संपल्यानंतर प्रमुख वक्त्यांना मार्गदर्शनासाठी आमंत्रित करण्यात आले.

❖ **प्रमुख पाहुणे :- मा.प्रा.डॉ.विनोद उपर्वट (एस.एन.डी.टी. महा. धुळे )**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विविध पैलु या विषयावर डॉ.विनोद उपर्वट सरांनी सर्वांसमोर सर्वात मोठा प्रश्न मांडला होता, तो म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे दलितांचेच कैवारी होते का? कारण डॉ. आंबेडकरांनी जाती, धर्म, वंश, लिंग यांचा भेदभाव न करता सर्वांच्या विकासासाठी कार्य केले आहे तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे दलितांचेच कसे कैवारी होणार. त्यांनी शेतकऱ्यांचेही प्रश्न सोडविले, कामगारांसाठीही काम केले, कलम ३४० मध्ये स्वातंत्र ओबीसी (OBC) आयोग यावरही चर्चा करण्यात आली होती. भारतामध्ये OBC मध्ये एकूण ३७४३ जाती आहेत. आदिवासी समुदायासाठी तसेच

विविध आयोग नेमण्यात आले. हिंदु कोड बिल, मनुस्मृती कायदे, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या कायदेमधील पदांचा राजीनामा इत्यादी मुद्यांवर मार्गदर्शन करण्यात आले.

❖ **कार्यक्रमाचे अध्यक्ष :- प्रा. डॉ. सुवर्णा बरडे**

अध्यक्षीय भाषणात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे क्रांतीकारी विचार यावर भर दिला तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कोणताही भेद न करता सर्वासाठी कार्य केले आहे. त्यामुळे त्या प्रश्नावर विचार करणे त्यांना योग्य वाटले अशा प्रकारे अध्यक्षीय भाषणाने कार्यक्रमाच्या समारोप हा करण्यात आला. तसेच श्री. पुडलिक खंडेकर यांनी आलेल्या मान्यवरांचे आभार मानले आणि अध्यक्षांच्या परवानगीने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. कार्यक्रम यशस्वी होण्याकरिता सर्व विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवुन प्रयत्न केले.

## *दिनांक - २०/०१/२०१६*

❖ **प्रस्तावना :-**

समता शिक्षण संस्था, पुणे संचलित, डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजकार्य महाविद्यालय, मोराणे ता.जि. धुळे येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १२५ वी जयंती निमित्त ग्रंथालयामार्फत भारतीय संविधान वाचन सप्ताह अयोजित करण्यात आला असुन आज दिनांक २०/०१/२०१६ वार बुधवार असुन कार्यक्रमाचा तिसरा दिवस तसेच कार्यक्रमाची सुरुवात संविधान वाचनाने आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पुजन करुन करण्यात आले आणि आलेल्या प्रमुख पाहुण्यांचे ग्रंथालयाच्या वतीने भारताचे संविधान व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले व पाहुण्यांचा ओळख परिचय करण्यात आला. सदरील कार्यक्रमास सर्व वर्गातील विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणुन प्रा. राजीव आरके, विद्यावर्धिनी महाविद्याल, धुळे हे होते. तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा.प्रमोद भुंबे व ग्रंथपाल गजेंद्र जगदेव उपस्थित होते. त्याचप्रमाणे आलेल्या मान्यवरांचे आणि अध्यक्षांचे स्वागत करण्या आले आणि प्रमुख पाहुण्यास मार्गदर्शनासाठी आमंत्रित करण्यात आले.

❖ **प्रमुख पाहुणे :- मा. प्रा. राजीव आरके (विद्यावर्धिनी महाविद्यालय, धुळे )**

प्रमुख पाहुण्यांच्या मार्गदर्शनात त्यांनी सांगितले की, संविधानात नागरिकांसदर्भात काही तरतुदी आहेत का? तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे संविधानात योगदान, संसदिय लोकशाहीचे महत्व, डॉ. आंबेडकरांनी केलेली राजकारणाची व्याख्या, संसदिय राजकारण, न्यायाची संकल्पना, भारतीय संसद ही न्यायाची सर्वात मोठी विचारपेठ आहे. संसदेला असलेला लोकांचा पाठिंबा, लोकशाही, इंग्लडची संसदीय शासनप्रणाली, लोकप्रतिनिधी तसेच बंधुता म्हणजे लोकशाही अशा अनेक

मुद्यांवर त्यांनी भर टाकला. त्याचबरोबर कलम १४ कर्तव्य विषयक यावरही भर टाकण्यात आली आणि राज्यघटनेतील बहुतेक मुद्यांचे थोडक्यात स्पष्टीकरण दिले.

❖ **कार्यक्रमाचे अध्यक्ष :- प्रा. प्रमोद भुंबे**

कार्यक्रमाच्या अध्यक्षीय भाषणात अध्यक्षांनी राज्यघटनेत दिलेल्या मुलभूत हक्क, कर्तवय, भारतीय राष्ट्र हे समाजावादी राष्ट्र आहे. अनेक देशाकडुन वेगवेगळ्या प्रकारची शासनपध्दती ही स्वीकारण्यात आली आहे. अशा प्रकारच्या मुद्यांवर अध्यक्षीय भाषण आणि समारोप हा करण्यात आला. तसेच आलेल्या मान्यवरांचे आणि अध्यक्षांचे व उपस्थितांचे आभार हे कु. दिपाली बैरागी यांनी व्यक्त केले आणि अध्यक्षांच्या परवानगीने कार्यक्रमाचा शेवट करण्यात आला. सदरील वाचनसप्ताहाच्या कार्यक्रमांस विद्यार्थी उपस्थित होते.

## *दिनांक - २३/०१/२०१६*

❖ **प्रस्तावना :-**

समता शिक्षण संस्था, पुणे संचलित, डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजकार्य महाविद्यालय, मोराणे ता.जि. धुळे येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १२५ वी जयंती निमित्त ग्रंथालयामार्फत भारतीय संविधान वाचन सप्ताह अयोजित करण्यात आला असुन आज दिनांक २३/०१/२०१६ वार शनिवार असुन कार्यक्रमाचा चौथा दिवस असुन भारतीय संविधान आणि महिलांचे सबलीकरण या विषयावर मार्गदर्शन ठेवण्यात आले होते.

सदर कार्यक्रमाची सुरुवाता १२:३० वा झाली कार्यक्रमाल प्रमुख वक्ते म्हणुन चोपडा समाजकार्य महाविदयालयातील प्रा. संबोधी देशपांडे ह्या लाभल्या. तसेच कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणुन प्रा. प्रिती वहाणे ह्या लाभल्या. तसेच कार्यक्रमास श्री. संतोष कडाळे, महाविद्यालयाचे प्राचार्य. डॉ. जालिंदर अडसुळे उपस्थित होते. सर्वप्रथम डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पुजन मान्यवरांच्या हस्ते झाले. त्यानंतर प्रमुख वक्त्यांचे परिचय करण्यात आला त्यानंतर उपस्थित मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. स्वागताचा कार्यक्रम संपल्यानंतर प्रमुख वक्त्यांना मार्गदर्शनासाठी आमंत्रित करण्यात आले. ग्रंथपाल गजेंद्र जगदेव यांनी प्रमुख पाहुणे प्रा. संबोधी देशपांडे यांना महाविद्यालयाच्या वतीने भारताचे संविधान भेट देण्यात आले.

❖ **प्रमुख पाहुणे :- मा. प्रा. संबोधी देशपांडे (समाजकार्य महाविद्यालय, चोपडा)**

प्रा. संबोधी देशपांडे यांनी भारतीय संविधान आणि महिला सबलीकरण या विषयावर मार्गदर्शन करतांना तीन टप्प्यात मार्गदर्शन केले. सर्वप्रथम त्यांनी महिला सबलीकरण या संकल्पनेचा अर्थ त्यांच्या शब्दात मांडतांना त्यांनी महिला सबलीकरण

म्हणजे महिलांना पुरुषांच्या सोबत काम करण्याची संधी निर्माण करुन देणे होय. महिलांसाठी १९७५ हे वर्ष आंतरराष्ट्रीय महिला वर्ष म्हणुन जाहीर करण्यात आले. तरी आज महिला सबल नाही तर ती अबला आहे. कारण तीला तीच्यातील सुप्त गुणांची जाणीव नाही. पुढे त्यांनी आपल्या मार्गदर्शनात मांडले की राजकीय, चित्रपटसृष्टी, क्रिडा यासर्व क्षेत्रात महिला आघाडीवर आहे. परुतु तरी क्वचीतच महिला त्या क्षेत्रातही दिसुन येतात. त्यामुळे प्रत्येक स्त्री प्रबळ झाली हे म्हणणे चुकीचे ठरेल. त्यानंतर त्यांनी महिलांचा इतिहास मांडला. त्यात गार्गी, मैत्रेयी या स्वातंत्र्याचा पुरस्कार करणाऱ्या महिलांचा उल्लेख केला. त्यानंतर इतिहासापासुन तर आतापर्यंत महिला कशप्रकारे अत्याचारास बळी पडत आहेत. याबद्दल सांगितले त्यात सतीप्रथा, केशवपन, बालविवाह व जरटविवाह आणि आता चालु असलेले कौटुंबिक हिंसाचार, हुंडाबळी, बलात्कार या समस्यांचा उल्लेख केला. तसेच संविधानातील महिलांसबंधी काही तरतुदी केल्या आहेत. त्याचा उल्लेख केला त्यात आरक्षण व मतदान यांचे स्पष्टपणे सारांश मांडले. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकराचा महिलासंबंधी असलेला विकासात्मक दृष्टीकोन मांडल त्यात हिंदु कोडबील व महिलासंबंधी लिहलेले काही पुस्तके याच उदाहरण दिले. तसेच युवकांनी डॉ. बाबबसाहेब आंबेडकरांनी सांगितलेली ज्ञान, करुणा, शील, मैत्री, संधी ह्या पंचसुत्रीचे पालन करावे असे सांगितले. तसेच तोड मर्दा हे गीत सादर करुन आपल्या मनोगतचा शेवट केला.

❖ **कार्यक्रमाचे अध्यक्ष :- प्रा. प्रीती वहाणे**

कार्यक्रमाच्या अध्यक्षीय भाषणात अध्यक्षांनी प्रमुख वक्त्यांनी केलेल्या मार्गदर्शनचा सारांश आपल्या शब्दात मांडण्याचा प्रयत्न केला. त्या अध्यक्षांनी सांगितले की, स्वातंत्र्य, समता, बंधुता या मुल्यांचा विचार करत ही मुल्ये स्त्रीसाठी लागु आहे का? असा प्रश्न सर्वांसमोर मांडला. स्त्रीला स्वातंत्र्य इतिहासापासुन तर आतापर्यंत नाही मग दिलेली मुल्ये फक्त पुरुषांसाठीचीच आहेत का? असा समाजातील भेद त्यांनी सर्वांसमोर मांडला. पुढे त्यांनी इतिहासापासुन आतापर्यंत स्त्री फक्त आकर्षणाची , भोगाची वस्तु मानली गेली आहे असे मांडले. पुरुषाशिवाय स्त्रीचे अस्तित्व नाही हे पुर्वीपासुन मानलेली प्रथाच झाली आहे असेही त्यांनी आपल्या मानोगतात व्यक्त केले. शेवटी त्यांनी स्त्री मुक्ती, स्त्रीचा विकास हाच देशाच्या विकासचामार्ग आहे असे सांगितले. शेवटी कार्यक्रमाचे अभार प्रदर्शन मुन्ना पठाण यांनी मांडले, अशाप्रकारे भारतीय संविधान वाचन सप्ताहाचा चौथा दिवस पार पडला.

## *दिनांक - २७/०१/२०१६*

❖ **प्रस्तावना :-**

समता शिक्षण संस्था, पुणे संचलित, डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजकार्य महाविद्यालय, मोराणे ता.जि. धुळे येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १२५ वी जयंती निमित्त ग्रंथालयामार्फत भारतीय संविधान वाचन सप्ताह अयोजित करण्यात

आला असुन आज दिनांक २०५/०१/२०१६ वार सोमवार असुन कार्यक्रमाचा पाचवा दिवस असुन भारतीय संविधाना पुर्नविलोकन या विषयावर मार्गदर्शन करण्यात आले.

सदर कार्यक्रमाची सुरुवात १२:३० वा. झाली कार्यक्रमाला प्रमुख वक्ते म्हणुन प्रा. विलास चव्हाण सर (विभाग प्रमुख, पालेशा वाणिज्य महाविद्यालय, धुळे) हे लाभले तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा.डॉ.सुदाम राठोड सर, प्रमुख पाहुणे प्रा. डा. जलिंदर अडसुळे तसेच ग्रंथपाल प्रा. गजेंद्र जगदेव सर उपस्थित होते. सर्वप्रथम डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पुजन मान्यवरांच्या हस्ते झाले. त्यानंतर प्रमुख वक्त्यांचे परिचय करण्यात आला त्यानंतर उपस्थित मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. भारताचे संविधान हा मौलिक ग्रंथ प्रमुख पाहुणे यांना भेट म्हणुन देण्यात आला.

स्वागताचा कार्यक्रम संपल्यानंतर प्रमुख वक्त्यांना मार्गदर्शनासाठी आमंत्रित करण्यात आले.

❖ **प्रमुख वक्ते :- मा. प्रा. विलास चव्हाण (पालेशा वाणिज्य महाविद्यालय, धुळे )**

भारतीय संविधानचे पुर्नविलोकन या विषयावर प्रमुख्य वक्त्यांनी २६ नोव्हेंबर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे प्रारुप भाषण यावर भर दिला. अनुसूचित जातीचे हितसंबंध, एकसंघपणाची भावना, दर्जा आणि संधीची समानता, धर्म आणि राजा यांचे एकसुत्रीकरण, घटना दुरुस्त्या १९३५ चा भारत सरकारचा कायदा, कलम-१४ जात धर्म यात पक्षपात करता येणार नाही. कलम-१६ समान संधी, कलम १९ व्यक्ती स्वातंत्र्य, कलम २९ धार्मिक स्वातंत्र्य, समता, सामाजिक न्याय, बंधुता इ. तथ्ये इ. मुदयांवर प्रमुख वक्त्यांनी मार्गदर्शन हे केले.

❖ **कार्यक्रमाचे अध्यक्ष :- प्रा. डॉ. सुदाम राठोड**

कार्यक्रमाच्या अध्यक्षीय भाषणात अध्यक्षांनी काही बाबींचा संकल्प करुन घेतला. १) घटनेच्या अनेक पैलुंची अंमलबजावणी, २) वंचितासाठी माझे आयुष्य लागु , ३) वाचन, चिकित्सा आणि व्यवस्थेचा प्रश्न ४) भारतीय राज्यटनेचे सतत वाचन ५) घटनेतील अनेक बाबी इतरांना सांगणार आहेत का? अशा पाच बार्बीवर अध्यक्षांनी सकल्प केला आणि अध्यक्षीय समारोप एक गीताच्या माध्यमातुन करण्यात आला.

दिनांक - २६/०१/२०१६

समता शिक्षण संस्था, पुणे संचलित, डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजकार्य महाविद्यालय, मोराणे ता.जि. धुळे आणि भागाबाई आनंदा वाघ प्राथमिक आश्रमशाळा मोराणे ता.जि. धुळे येथे संयुक्त विद्यमाने प्रजासत्ताक दिनाचे आयोजन प्राथमिक आश्रमशाळा, मोराणे येथे ओयाजित करण्यात आले होते.

सुरुवातीस ध्वजारोहणाचा कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. जालिंदर अडसुळे, प्रमुख पाहुणे श्री.सिताराम आनंदा वाघ (माजी पोलिस पाटील), शालेय समितीचे चेअरमन श्री.भाईदास पवार, आश्रम शाळेचे मुख्यध्यापक श्री.राजेंद्र पाटील आणि महाविद्यालयातील व आश्रमशाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच विद्यार्थ्यी यांच्या उपस्थितीत ध्वजारोहणाचा कार्यक्रम घेण्यात आला. त्यानंतर सर्व उपस्थितांनी झेंडागीत व राष्ट्रगीत म्हणुन प्रजासत्ताक दिन साजरा केला. प्रजासत्ताक दिनानिमीत्ताने शाळेच्या विद्यार्थ्यांनी भाषणे दिलीत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजकार्य महाविद्यालय, मोराणे येथे दि. १८/०१/२०१६ ते दि. २६/०१/२०१६ या कालावधीत भारतीय संविधान वाचन सप्ताह कार्यक्रमाचे आयेजन करण्यात आले होते. सदरील कार्यक्रमाचा समारोप कार्यक्रम दि. २६/०१/२०१६ रोजी आयोजित करण्यात आला होता. भारतीय संविधान वाचन सप्ताहाच्या समारोप प्रसंगी महाविद्यालयातील विद्यार्थी कु. कृष्णा कोळी व भुषण शिंदे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. दरवर्षी आपल्या महाविद्यालयात संविधान वाचन सप्ताह आयोजित केला जातो. सर्व विद्यार्थ्यांना संविधानाविषयी तसेच आपल्या मुलभूत अधिकारांविषयी माहिती होते. तसेच सप्ताहातील प्रत्येक दिवशी वेगवेगळ्या विषयांवर व्याख्यात्यांचे मार्गदर्शन मिळाल्यामुळे आमच्या ज्ञानात अधिक भर पडली, महाविद्यालयाचा हा नाविण्यपुर्ण उपक्रम आहे त्यामुळे असा संविधान वाचन सप्ताह दरवर्षी आयोजित व्हावा, असे मनोगत भारतीय संविधान वाचन सप्ताहाबद्दल विद्यार्थ्यांनी व्यक्त केले. महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. जालिंदर अडसुळे यांनी प्रजासत्ताक दिनाचे महत्व सांगितले आणि भारतीय संविधानाबद्दलही आपले मनोगत व्यक्त केले.

सदरील कार्यक्रमाचे सुत्रसंचालन मुन्ना पठाण यांनी केले. कार्यक्रम यशस्वी होण्याकरीता ग्रंथपाल श्री.गजेंद्र जगदेव व ग्रंथालयातील कर्मचारी श्री.सुभाष बागुल, श्री. विजय आगळे, श्री. विशाल भदाणे यांनी सहकार्य केले. तसेच सदरील कार्यक्रमात महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारीवृंद आणि विद्यार्थ्यी उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता सर्व उपस्थितांचे व मान्यवरांचे आभार मानुन करण्यात आले.

ग्रंथपाल
LIBRARIAN,
Dr. Babasaheb Ambedkar College of Social Work, Morane (Nakane) Tal. Dist. Dhule.

Samata Shikshan Sanstha, Pune's
Dr. Babasaheb Ambedkar College of Social Work, Morane, Dhule (M.S.)

प्राचार्य
DR.JALINDAR ADSULE
PRINCIPAL
Samata Shikshan Sanstha,Pune's
Dr.Babasaheb Ambedkar College of Social Works,Morane(Nakane)
Tal. & Dist.Dhule (M.S.) - 42400

Samata Shikshan Sanstha Pune-30
Dr.Babasaheb Ambedkar College of Social Work,Morane
Tal.Dist.Dhule424002

---

Indian Constitution Reading Weekly Program 2015-16 Photo






Principal Dr.J.B.Adsule Sir ,Prof.Sambodhi Deshpande Madam

Dr.Babasaheb Ambedkar College of Social Work,Morane,Dhule (M.S.) ★ Samata Shikshan Sanstha, Pune's

DR.JALINDAR ADSULE
PRINCIPAL
Samata Shikshan Sanstha,Pune's
Dr.Babasaheb Ambedkar College of Social Works,Morane(Nakane)
Tal. & Dist.Dhule (M.S.) - 42400







मा: प्राचार्य डॉ. जालींदर अडसुळे सर प्रतिमापूजन करतांना छायाचित्रात दिसत आहे.

Dr.Babasaheb Ambedkar College of Social Work, Morane, Dhule (M.S.) ★ Samata Shikshan Sanstha, Pune's

**DR.JALINDAR ADSULE**
PRINCIPAL
Samata Shikshan Sanstha,Pune's
Dr.Babasaheb Ambedkar College of Social Works,Morane(Nakane)
Tal. & Dist.Dhule (M.S.) - 42400





Principal Dr.J.B.Adsule Sir ,Prof.Vilas Chavan Sir.





विचारपीठावर उपस्थित मान्यवर प्रा. विलास चव्हाण सर,
प्राचार्य. डॉ. जालींदर अडसुळे सर, इतर.

Dr. Babasaheb Ambedkar College of Social Work, Morane, Dhule (M.S.)
Samata Shikshan Sanstha, Pune's

DR. JALINDAR ADSULE
PRINCIPAL
Samata Shikshan Sanstha, Pune's
Dr. Babasaheb Ambedkar College of Social Work, Morane (Nakane),
Tal. & Dist. Dhule (M.S.) - 42400

Present Students & College Teaching &Non Teaching Staff.





Indian Constitution Lecturer Delivered by Prof.Vilas Chavan Sir

Dr.Babasaheb Ambedkar College of Social Work, Morane Dhule (M.S.) Samata Shikshan Sanstha Pune's

DR.JALINDAR ADSULE
PRINCIPAL
Samata Shikshan Sanstha,Pune's
Dr.Babasaheb Ambedkar College of Social Works,Morane(Nakane)
Tal. & Dist.Dhule (M.S.) - 42400

समता शिक्षण संस्था, पुणे-३०

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजकार्य महाविद्यालय, मोराणे (नकाणे) ता. जि. धुळे



---

**भारतीय संविधान वाचन सप्ताह २०१६-१७ दिनांक-३०/०१/२०१७**

## अहवाल

**दिवस - पहिला दि. २०/०१/२०१७**

समता शिक्षण संस्था, पुणे संचलित, डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजकार्य महाविद्यालय, मोराणे ता.जि. धुळे येथे भारतीय संविधान वाचन सप्ताहाचा पहिला दिवस संपन्न झाला. या कार्यक्रमाचे प्रमुख उद्घाटक म्हणुन धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघाचे सेक्रेटरी मा.सुनिल पाटील व प्रमुख मार्गदर्शक व प्रमुख पाहुणे मा. श्री. रविंद्र इंगळे धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष हे उपस्थित होते. तर कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जालिंदर अडसुळे, शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. उपस्थितीत मान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलन व प्रतिमा पुजन करुन कार्यक्रमाचे उद्घाटन ठिक सकाळी १०:३० वाजता करण्यात आले. त्यानंतर भारतीय संविधान उद्देशिकाचे सामुहिक वाचन करण्यात आले.

मा.श्री.सुनिल पाटील यांनी आपल्या भाषणातुन सुरवातीला आपल्या जीवनातील अनुभव सांगितले. तसेच विद्यार्थ्यांना शिक्षणात आवड निर्माण होण्यासाठी शासन वेगवेगळे पायंडे पाडत आहे. तसेच पत्रकारीता ही देशाचा चौथा स्तंभ म्हणुन ओळखला जातो असे सांगुन सरांनी संविधान वाचन सप्ताहाला शुभेच्छा दिल्या.

मा.श्री. रविंद्र इंगळे यांनी आपल्या भाषणातुन सांगितले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना देशाच्या घटना समितीवर जाण्यासाठी सुध्दा संघर्ष करावा लागला होता. बंगाल या प्रांतातुन अनुसूचित जातीच्या पाठिंव्यातुन घटना समितीत निवडुन आले. त्यानंतर पंडित जवाहरलाल नेहरु आणि महात्मा गांधी यांनी त्यांना मसुदा समितीचे अध्यक्ष केले. डॉ. आंबेडकरांनी जगातील इतर घटनांचा अभ्यास करुन जगातील सर्वात मोठी लिखित राज्यघटना तयार करुन भारताला सुपुर्द केली असे श्री. इंगळे यांनी आपल्या भाषणातुन मांडले.

अध्यक्षीय भाषणात महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी आपला भारत देश अनेक भाषा, धर्म, प्रांत, जाती, संस्कृतीमध्ये विभागलेला देश आहे. या सर्वांना एकत्र ठेवण्याचे काम राज्यघटनेने केले आहे. भारतासारख्या अवाढव्य देशाच्या व्यवस्थेला टिकवुन ठेवण्यासाठी लोकशाही पध्दतीचा स्वीकार केला आहे. भारतीय राज्यघटनेच्या कायदयांच्या दुरुस्तीनंतर शिक्षण सक्तीचे व मोफत करण्यात आले आहे. गरजेनूसार वेगवेगळे कायदे करण्याचा अधिकार सर्वोच्च न्यायालयाला दिला आहे. तसेच भारतीय राज्यघटनेत महलांचे, बालकांचे, कामगारांचे असे अनेक कायदे आहेत. तसेच डॉ. अडसुळे सरांनी भारतीय राज्यघटनेत उद्देशिकेचे किती महत्व आहे हे त्यांनी विद्यार्थ्यांना पटवुन दिले.

सदरील कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. सुभाष बागुल यांनी केले तसेच सुत्रसंचालन कु. भारती रविना व मान्यवरांचे आभार अनिल देवरे यां विद्यार्थ्यांनी मानले. अशा प्रकारे संविधान वाचन सप्ताह कार्यक्रमाचे नियोजन ग्रंथपाल गजेंद्र जगदेव यांनी केले. तसेच कार्यक्रमास महाविद्यालयाचे शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी वर्ग उपस्थित होते.

**दिवस - दुसरा दि. २१/०१/२०१७**

समता शिक्षण संस्था, पुणे संचलित, डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजकार्य महाविद्यालय, मोराणे ता.जि. धुळे येथे भारतीय संविधान वाचन सप्ताहाचा दुसरा दिवस संपन्न झाला. या कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक व प्रमुख पाहुणे म्हणुन मा. श्री. निखिल सुर्यवंशी (धळे जिल्हा दैनिक सकाळ, उपमुख्य संपादक) तर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणुन महाविद्यालयाचे प्राध्यापक डॉ. सुदाम राठोड, शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. उपस्थितीत मान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलन व प्रतिमा पुजन करुन कार्यक्रमाचे उद्‌घाटन ठिक सकाळी १०:३० वाजता करण्यात आले.

उद्‌घाटन कार्यक्रम झाल्यानंतर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी भारतीय संविधानाचे वाचन केले. त्यानंतर मा. श्री. निखिल सुर्यवंशी सर यांचे पुढिल विषयावर भारतीय संविधान आणि आरक्षण या विषयावर मार्गदर्शन करीत असतांना ते म्हणाले की, आरक्षण देण्याचा मुळ हेतु मागासवर्गीय अनुसूचित जाती- जामातीतील तसेच शोषित वंचित समुहाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांचा सामाजिक , आर्थिक सर्वांगिण विकास व्हावा आणि त्यांना मानव म्हणुन जगता यावे याकरीता भारतीय संविधानात आरक्षण नमुद करण्यत आले आहे. अस्पृश्यांना मानव म्हणुन ओळख नव्हती ही बाब ओळखुन संविधानकारांनी त्यांना आरक्षण दिले असल्याचे सांगितले. आरक्षण हे खऱ्या व गरजु लाभार्थ्यांना मिळायला पाहिजे, त्यांना साठ वर्षानंतर देखील त्यांची आर्थिक परिस्थीत सुधारलेली नसल्यामुळे तो घटक तसाच वंचित राहिला आहे. त्यांच्यात पाहिजे तेवढा विकास झालेला नाही म्हणुनच अरक्षणाची गरज आहे. आपल्या जातीतील आर्थिक परिस्थिती सुधारलेल्या लोकांनी आरक्षणाचा लाभ वंचित राहिलेल्या घटकांपर्यंत पोहचवला पाहिजे असेही ते म्हटले. तसेच आरक्षण मागणे हा चुकीचा मार्ग नसुन तो प्रत्येक समाजाचा प्रगतीचा मार्ग आहे. समाजाकार्य महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सकारात्मक दृष्टीकोन डोळ्यासमोर ठेवुन जाणीवजागृती करावी असे आवाहन केले.

अध्यक्षीय भाषणात महाविद्यालयाचे प्राध्यापक डॉ. सुदाम राठोड यांनी केले, त्यात त्यांनी आरक्षण हे सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, राजकीय क्षेत्रात समानता आणण्याचे अस्त्र असल्याचे म्हटले. भारतीय संविधान विषमता नष्ट करण्याचे उत्तर देते. तसेच राज्यघटना प्रत्येक नागरिकाला प्रश्न विचारण्याची मुभा देते. भारतीय राज्यघटनेने प्रत्येक व्यक्तीला स्वातंत्र्य, न्याय मिळवुन देण्याचा प्रयत्न केला आहे. व्यक्तीच्या विकासासाठी आरक्षण हा मुद्दा गरजेचा असल्याचे त्यांनी म्हटले. त्यानंतर त्यांनी सर्वांना सामाजिक न्यायासाठी लढणे, स्वतः प्रयत्न करत राहणे

असे म्हणुन आवाहन केले. त्यानंतर त्यांनी वादळी वाऱ्यामंदी हे गीत म्हणुन आपले अध्यक्षीय समारोपीय भाषण संपविले.

सदरील कार्यक्रमाचे सुत्रसंचालन अमीर झारी व मान्यवरांचे आभार कु. ललीता कचवे या विद्यार्थ्यांनी मानले. अशा प्रकारे संविधान वाचन सप्ताह कार्यक्रमाचे नियोजन ग्रंथपाल गजेंद्र जगदेव व ग्रंथालय कर्मचारी यांनी केले. तसेच कार्यक्रमास महाविद्यालयाचे शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी वर्ग उपस्थित होते.

**दिवस - तिसरा दि. २३/०१/२०१७**

समता शिक्षण संस्था, पुणे संचलित, डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजकार्य महाविद्यालय, मोराणे ता.जि. धुळे येथे भारतीय संविधान वाचन सप्ताहाचा तिसरा दिवस संपन्न झाला. या कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक व प्रमुख पाहुणे म्हणुन अभय महाविद्यालयाचे प्राध्यापक मा. श्री. आर. ए. वाघ तर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणुन महाविद्यालयाचे प्राध्यापक राहुल आहेर, शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. उपस्थितीत मान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलन व प्रतिमा पुजन करुन कार्यक्रमाचे उद्घाटन ठिक सकाळी १०:३० वाजता करण्यात आले.

उद्घाटन कार्यक्रम झाल्यानंतर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी भारतीय संविधानाचे वाचन केले. त्यानंतर मा. प्रा. आर. ए. वाघ सर यांचे "भारतीय संविधान आणि संघराज्य पध्दती" या विषयावर मार्गदर्शन करीत असतांना ते म्हणाले की, भारतीय राज्यघटना ही देशाचा पाया आहे, देशाची ती जीवनप्रणाली आहे. देशाला योग्य मार्गावर नेण्यासाठी राज्यघटना महत्वाची आहे. भारतीय राज्यघटनेची निर्मिती होण्यापुर्वी त्यांच्या निवडणुका झाल्या व ह्यात स्वातंत्र्य लढ्यात ज्यांनी आपले योगदान दिले त्यांची निवड घटना परिषदेसाठी झाली. भारतीय राज्यघटनेत इतर देशातील चांगल्या तरतुदींचा समावेश घटनाकारांनी देशहितासाठी केला असल्याचे म्हटले. तसेच डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचे स्वप्न पुर्ण करणारी वाटचाल भारतीय राज्यघटना यशस्वीरीत्या करत असल्याचे म्हटले. त्यानंतर भारतीय राज्यव्यवस्थेत संघराज्य पध्दत असणे आवश्यक बाब असल्याचे त्यांनी म्हटले. संघराज्य पध्दती ही दुहेरी राज्यव्यवस्थेचे प्रतिनिधीत्व करते. त्यानंतर त्यांनी ७३ व्या व ७४ व्या घटना दुरुस्तीविषयी माहिती दिली. त्यात त्यांनी ग्रामीण भागाचा विकास होणे देश विकासासाठी आवश्यक आहे म्हणुन ७३ व्या घटनादुरुस्तीचे महत्व आहे असे त्यांनी आपले मत मांडले.

महाविद्यालयाचे प्राध्यापक राहुल आहेर यांनी आपल्या अध्यक्षीय भाषण केले, त्यात त्यांनी भारतीय राज्यघटनेत असलेल्या कलम ३७० याविषयी आपले मत व्यक्त केले. तसेच त्यांनी ३७० कलमासंदर्भात अनेक व्यक्तींचे व राजकीय पक्षांच्या वेगवेगळ्या भूमिका आहेत. परंतु जम्मु काश्मिर हा भारताचा अविभाज्य भाग आहे याबद्दलची जाणीव निर्माण करण्यासाठी कलम ३७० महत्वाचे असल्याच म्हटले. त्यानंतर त्यांनी भारतीय राज्यघटना ही एक भारतीय समाज व्यवस्थेची ओळख करुन देणारी असल्याचे सरांनी सांगितले. त्यानंतर त्यांनी संघराज्य पध्दती संदर्भात आपले मत मांडले.

सदरील कार्यक्रमाचे सुत्रसंचालन कु. गायत्री शिरसाठ व मान्यवरांचे आभार कु. प्रतिक्षा शिरसाठ या विद्यार्थिनींनी मानले. अशा प्रकारे संविधान वाचन सप्ताह कार्यक्रमाचे नियोजन ग्रंथपाल गजेंद्र जगदेव व ग्रंथालय कर्मचारी यांनी केले. तसेच कार्यक्रमास महाविद्यालयाचे शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी वर्ग उपस्थित होते.

**दिवस - चौथा दि. २४/०१/२०१७**

समता शिक्षण संस्था, पुणे संचलित, डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजकार्य महाविद्यालय, मोराणे ता.जि. धुळे येथे भारतीय संविधान वाचन सप्ताहाचा तिसरा दिवस संपन्न झाला. या कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक व प्रमुख पाहुणे म्हणुन झेड.बी. पाटील महाविद्यालयाच्या प्राध्यापिका डॉ. विद्या पाटील तर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणुन महाविद्यालयाचे प्राध्यापक राजेंद्र बैसाणे, शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. उपस्थितीत मान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलन व प्रतिमा पुजन करुन कार्यक्रमाचे उद्घाटन ठिक सकाळी ११:०० वाजता करण्यात आले.

उद्घाटन कार्यक्रम झाल्यानंतर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी भारतीय संविधानाचे वाचन केले. त्यानंतर मा. प्रा.डॉ. विद्या पाटीलय मॅडम यांचे "महिला सबलीकरण आणि हिंदु कोडबील" या विषयावर मार्गदर्शन करीत असतांना त्या म्हणाल्या की, सबलीकरण म्हणजे स्वतःचा निर्णय स्वतः घेणे किंवा इतरांच्या हितासाठी निर्णय घेण्याची क्षमता येणे. वैदिक काळात महिलांचा आदर होता, महिलांच्या हातात सत्ता होती. तसेच शिवकालिन परिस्थितीतही महिलांना मान होता. पुढे त्यांनी ब्रिटिश काळ व स्वातंत्र्यकालीन परिस्थितीतील महिलांची स्थिती मांडली. स्वातंत्र्यकाळातील विविध घटना ह्या महिलांसाठी त्यांच्या सबलीकरणासाठी झाल्या असल्याचे म्हटले व त्यात महत्वाची घटना म्हणजे भारतीय संविधानाची निर्मिती. त्यात त्यांनी म्हटले की, भारतीय संविधान निर्मितीत ज्या विविध समित्या तयार झाल्या होत्या त्यात १५ महिलांचा समावेश होता. त्यामुळे महिलांचेही पुरुषाप्रमाणेच समान आणि महत्वाचे योगदान त्या प्रक्रियेत होते. तसेच त्यांनी भारतीय राज्यघटनेतील कलम १४,१५, १६, १७ यासारख्या कलमांविषयी माहिती दिली व ते महिला सबलीकरणासाठी किती महत्वाचे आहे हे सांगत असतांना, ही कलमे समान संधी, सार्वजनिक ठिकाणी जाण्यास सर्वांना परवानगी, पोटगी कायदा, समान वेतन यांसारख्या महिलांना सबळ बनविण्याच्या दृष्टीने प्रतिनिधीत्व करतात असे सांगितले. फेब्रुवारी १९५१ मध्ये लोकसभेत हिंदुकोडबील बाबासाहेब आंबेडकर यांनी मांडले. परंतु डिसेंबर १९५१ मध्ये यास विरोध करण्यात आला असेही त्यांनी सांगितले. या कोडबीलास यश न येण्याचे कारण म्हणजे महिलांची असाक्षरता होय. तसेच पुरुषांनीही महिलांचा आज आदर केला पाहिजे, त्यांना समानतेची वागणुक दिली पाहिजे अशी अपेक्षा त्यांनी आपल्या मनोगताव्दारे व्यक्त केली.

त्यानंतर महाविद्यालयाचे प्राध्यापक राजेंद्र बैसाणे सर यांनी आपले अध्यक्षीय भाषण केले, त्यात त्यांनी हिंदु कोडबीलास विरोध करणारे व्यक्ती महिलांविरोधी होती, महिलांनी चौकटीतच राहावे याविचाराचे होते असे त्यांनी म्हटले. तसेच आज महिलांना त्यांच्या हक्कांविषयी, त्यांच्या योजनांविषयी जागरुकता नाही. आज महिला निर्णय प्रक्रिया, विचार

करणे, आपले मत मांडणे ह्या बाबींविषयी दुरावल्या आहेत. शेवटी त्यांनी लिंगभेद न करता एक समाजघटक म्हणुन त्यांना वागणुक दयावी अशी अपेक्षा व्यक्त केली.

सदरील कार्यक्रमाचे सुत्रसंचालन पुरषोत्तम केदार व मान्यवरांचे आभार कु. अश्विनी ठाकरे या विद्यार्थ्यांनी मानले. अशा प्रकारे संविधान वाचन सप्ताह कार्यक्रमाचे नियोजन ग्रंथपाल गजेंद्र जगदेव व ग्रंथालय कर्मचारी यांनी केले. तसेच कार्यक्रमास महाविद्यालयाचे शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी वर्ग उपस्थित होते.

**दिवस - पाचवा दि. २५/०१/२०१७**

समता शिक्षण संस्था, पुणे संचलित, डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजकार्य महाविद्यालय, मोराणे ता.जि. धुळे येथे भारतीय संविधान वाचन सप्ताहाचा पाचवा दिवस संपन्न झाला. या कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक म्हणुन अंधश्रध्दा निर्मुलन समतिचे राज्य कार्याध्यक्ष मा.श्री. अविनाश पाटील तसेच प्रमुख पाहुणे म्हणुन नागरी संयोजन समितीचे अध्यक्ष मा.श्री. विजाय जमादार व सामाजिक कार्यकर्ते मा.श्री. चंद्रवीर साळवे तर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणुन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जालिंदर अडसुळे, शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. उपस्थितीत मान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलन व प्रतिमा पुजन करुन कार्यक्रमाचे उद्घाटन ठिक सकाळी ९:०० वाजता करण्यात आले.

उद्घाटन कार्यक्रम झाल्यानंतर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी भारतीय संविधानाचे वाचन केले. त्यानंतर मा.श्री. अविनाश पाटील यांचे भारतीय संविधानाचे अंतरंग या विषयावर मार्गदर्शन करीत असतांना ते म्हणाले की, मानवी जीवनात संविधानाचे काय महत्व आहे, हे समजुन घेतले पाहिजे. संविधान त्यांची बांधिलकी आणि महोत्सव यांना प्रोत्साहन देणे, कारण संविधान हे आपल्या जीवनासाठी महत्वाचे आहे. संविधान आपणांस माणुस म्हणुन जगण्यास शिकवते. संविधानाची जनजागृती करण्यासाठी वेगवेगळे उपक्रम आणि आयोजन आपण सुरु केले पाहिजे. शाळा, महाविद्यालये, आदिवासी वस्त्या अशा विविध ठिकाणी संविधान सभेचे आयोजन केले पाहिजे. महाराष्ट्र एकमेव राज्य आहे ज्याला पुरोगामी विचारांचा वारसा लाभला आहे. असे विचार मांडलेल्या विचारवंताचा आपण अभ्यास केला पाहिजे असे त्यांनी मत व्यक्त केले.

मा.श्री.विजय जमादार यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना असे म्हटले की, भारतीय संविधानामध्ये अनेक गोष्टींचा उल्लेख करण्यात आला आहे. संविधान तयार करण्यासाठी एकुण ११ बैठका झाल्या. त्यासाठी १६५ दिवस लागले. तसेच सर्वांनी संविधानाच्या संकल्पनेचा अर्थ समजुन घेतला पाहिजे. संविधानातील प्रत्येक शब्दावर चर्चा घडवुन आणली पाहिजे.

त्यानंतर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जालिंदर अडसुळे सर यांनी आपले अध्यक्षीय भाषण केले, त्यात त्यांनी भारतीय संविधान सप्ताह गेल्या दहा वर्षापासुन आपल्या महाविद्यालयात सुरु करण्यात आलेला आहे. संविधाना लोकांपर्यंत पोहचविण्यासाठी वेगवेगळे उपक्रम, कार्यक्रम, पथनाट्ये, गीते , चळवळी इ. माध्यमातुन प्रत्येक

नागरीकापर्यंत संविधान हे पोहचविले पाहिजे. भारतीयांना स्वाभिमानाने जगण्याचा अधिकार राज्यघटनेने दिला आहे. भारतीय राज्यघटनेबद्दलची जागृती आणि तीचे कलमे समजुन घेऊन अन्यायाविरुध्द संघर्ष करायला शिकले पाहिजे असे मत प्राचार्य डॉ. अडसुळे सरानी मांडले.

सदरील कार्यक्रमाचे सुत्रसंचालन साजिद शेख व मान्यवरांचे आभार कल्पेश भामरे या विद्यार्थ्यांनी मानले. अशा प्रकारे संविधान वाचन सप्ताह कार्यक्रमाचे नियोजन ग्रंथपाल गजेंद्र जगदेव व ग्रंथालय कर्मचारी यांनी केले. तसेच कार्यक्रमास महाविद्यालयाचे शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी वर्ग उपस्थित होते.

**दिवस - सहावा दि. २६/०१/२०१७**

समता शिक्षण संस्था, पुणे संचलित, डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजकार्य महाविद्यालय, मोराणे ता.जि. धुळे येथे भारतीय संविधान वाचन सप्ताहाचा समारोपिय दिवस दि. २६/०१/२०१७ रोजी भागाबाई आनंदा वाघ आश्रमशाळा मोराणे येथे संपन्न झाला. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणुन शालेय शिक्षण समितीचे अध्यक्ष मा.श्री.भाईदास पवार, गावाचे पोलिस पाटील मा.श्री. सिताराम आ. वाघ, शाळेचे मुख्यध्यापक श्री. आर. पी.पाटील तर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणुन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जालिंदर अडसुळे सर उपस्थि होते. भारतीय संविधान वाचन सप्ताहात सहभागी असलेल्या विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त करतांना भारतीय संविधानाचे गांभिर्य, भारतीय संविधानाचे पालन न करण्याने निर्माण होणाऱ्या समस्या व सर्वसामान्यांमध्ये संविधानाविषयी नसलेली जागृती यांची सविस्तर मांडणी केली. तसेच भारतातल्या प्रश्नांचे निराकरण करण्यास संविधानातील प्रत्येक तरतुद हे ए उत्तर आहे, असे मत अमीर झारी व कु. माधवी पवार या विद्यार्थ्यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाचा समारोप महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जालिंदर अडसुळे यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतातुन व्यक्त केली. भारतीय संविधान वाचन सप्ताहाची सांगता शेवटी राष्ट्रगीताने करण्यात आली. सदरील कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाचे ग्रंथपाल श्री.गजेंद्र जगदेव, ग्रंथालय कर्मचारी श्री.मनोज ठाकरे, श्रीमती.आम्रपाली सुर्यवंशी, श्री.सुभाष बागुल, श्री.विजय आगळे, श्री.सुधिर पाटील, श्री.विशाल भदाणे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी होण्याकरीता सर्व विद्यार्थ्यांनी सहभाग घेवुन प्रयत्न केले.

ग्रंथपाल
LIBRARIAN,
श्री.गजेंद्र जगदेव
Dr. Babasaheb Ambedkar College of Social Work, Morane (Nakane) Tal. Dist. Dhule.

Dr.Babasaheb Ambedkar College of Social Work, Morane, Dhule (M.S.) ★ Samata Shikshan Sanstha, Pune's

प्राचार्य
DR.JALINDAR ADSULE
डॉ. जालिंदर अडसुळे
PRINCIPAL
Samata Shikshan Sanstha,Pune's
Dr.Babasaheb Ambedkar College of
Social Works,Morane(Nakane)
Tal. & Dist.Dhule (M.S.) - 42400

Samata Shikshan Sanstha Pune-30
Dr.Babasaheb Ambedkar College of Social Work,Morane
Tal.Dist.Dhule424002

---

## Indian Constitution Reading Weekly Program Photo 2016-17





प्रतिमापूजन करतांना प्रमुख पाहुणे व प्राचार्य.
डॉ. जालिंदर अडसुळे सर.

Dr.Babasaheb Ambedkar College of Social Work Morane,Dhule (M.S.) ★ Samata Shikshan Sanstha, Pune's

**DR.JALINDAR ADSULE**
**PRINCIPAL**
Samata Shikshan Sanstha,Pune's
Dr.Babasaheb Ambedkar College of Social Works,Morane(Nakane)
Tal. & Dist.Dhule (M.S.) - 42400

प्रमुख पाहुणे श्री. रविंद्र ईंगळे, मा. सुनिल पाटील, प्राचार्य सर.



प्रमुख पाहुणे यांचे स्वागत करतांना ग्रंथपाल अगरख



Dr. Babasaheb Ambedkar College of Social Work, Morane, Dhule (M.S.) ★
Samata Shikshan Sanstha, Pune's

DR.JALINDAR ADSULE
PRINCIPAL
Samata Shikshan Sanstha, Pune's
Dr. Babasaheb Ambedkar College of
Social Works, Morane(Nakane)
Tal. & Dist Dhule (M.S.) - 42400

भारतीय संविधान कार्यक्रमाचे सामुहिक वाचन.



महाविद्यालयाचे उपस्थित सर्व विद्यार्थी.



Dr. Babasaheb Ambedkar College of Social Work, Morane, Dhule (M.S.)
Samata Shikshan Sanstha, Pune's

DR. JALINDAR ADSULE
PRINCIPAL
Samata Shikshan Sanstha, Pune's
Dr. Babasaheb Ambedkar College of Social Works, Morane (Nakane)
Tal. & Dist. Dhule (M.S.) - 42400

भारतीय संविधान कार्यक्रमात उपस्थित विद्यार्थी व कर्मचारी.





DR.JALINDAR ADSULE
PRINCIPAL
Samata Shikshan Sanstha,Pune's
Dr.Babasaheb Ambedkar College of
Social Works,Morane(Nakane)
Tal. & Dist.Dhule (M.S.) - 42400



समता शिक्षण संस्था, पुणे संचलित

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजकार्य महाविद्यालय, मोराणे (नकाणे) ता.जि.धुळे.**

---

**"भारतीय संविधान वाचन सप्ताह "कार्यक्रम**

**अहवाल (२०१७-१८)**

समता शिक्षण संस्था, पुणे संचलित, डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजकार्य महाविद्यालय, मोराणे ता.जि. धुळे येथे दिनांक १९/०१/२०१८ ते २६/०१/२०१८ या कालावधित "भारतीय संविधान वाचन" सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला प्रमुख उद्‌घाटक म्हणुन धुळे ग्रामीण मतदार संघाचे आमदार मा. बाबासो. कुणालजी पाटील हे उपस्थित होते. तर कर्म.आ.भा. पाटील महाविद्यालय, पिंपळनेर येथील मराठी विभागाचे प्राध्यापक प्रा.डॉ. सतिश म्हस्के हे प्रमुख मार्गदर्शक म्हणुन उपस्थित होते. तर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जालिंदर अडसुळे हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विराजमान होते.

कार्यक्रमाचे उद्‌घाटन आमदार मा.कुणालजी पाटील, प्रमुख मार्गदर्शक प्रा. डॉ. सतिश म्हस्के, प्राचार्य डॉ.जालिंदर अडसुळे सर व मंचावरील उपस्थित इतर मान्यवर यांच्याहस्ते डॉ.बाबसाहेबांच्या प्रतिमेचे पुजन करुन व संविधानाची उद्देशिका वाचुन भारतीय संविधान वाचन सप्ताहाचे उद्‌घाटन करण्यात आले होते.

संविधान वाचन सप्तहानिमित्त दि. १९/०१/२०१८ रोजी बी.एस.डब्ल्यू. प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांसाठी पोस्टर प्रदर्शन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी उत्फुर्तपणे सहभाग नोंदविला आणि सहभागी विद्यार्थ्यांमधुन प्रथम क्रमांक सागर गायकवाड, व्दितीय क्रमांक अस्मिता वानखेडे तर तृतीय क्रमांक जयमाला निकम यांनी पटकावला.

दिनांक २०/०१/२०१८ रोजी बी.एस.डब्ल्यू. व्दितीय वर्षातील विद्यार्थ्यांसाठी घोषवाक्य (Slogan) स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत सहभागी विद्यार्थ्यांमधुन प्रथम क्रमांक शेख साजिद, व्दितीय क्रमांक कु. मोनाली ठाकरे तर तृतीय क्रमांक कु. सुनिता बिलकुले यांनी मिळवला.

दिनांक २२/०१/२०१८ रोजी बी.एस.डब्ल्यू. तृतीय वर्ष व एम.एस.डब्ल्यू. व्दितीय वर्षातील विद्यार्थ्यांसाठी पथनाट्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. सदर स्पर्धा ही त्या त्या वर्गातील विद्यार्थ्यांनी आपले गट पाडुन पथनाट्य सादर केले. त्यात बी.एस.डब्ल्यू. तृतीय वर्ष वर्गातील विद्यार्थ्यांमधुन ललिता साबळे ग्रुप यांनी सादर केलेल्या **आंतरजातीय विवाह** याविषयी पथनाट्याला प्रथम क्रमांक तर सुनिल बहिरम ग्रुप यांनी सादर केलेल्या **संविधान ने हमे क्या दिया** याविषयी पथनाट्याला व्दितीय क्रमांक मिळाला. तसेच एम.एस.डब्ल्यू. व्दितीय वर्ष वर्गातील विद्यार्थ्यांमधुन हिमानी पवार ग्रुप यांनी सादर केलेल्या **स्वातंत्र्य, समता, न्याय व बंधुता** याविषयी पथनाट्याला प्रथम क्रमांक तर विकास पाटील ग्रुप यांनी सादर केलेल्या **संविधान संरक्षण** याविषयी पथनाट्याला व्दितीय क्रमांक मिळाला.

दिनांक २३/०१/२०१८ रोजी एम.एस.डब्ल्यू. प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांसाठी **भारतीय संविधान हा** एक राष्ट्रीय ग्रंथ आहे. संबंधीत विषयांवर वर्क्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी उत्फुर्तपणे सहभाग घेतला आणि सहभागी विद्यार्थ्यांमधुन प्रथम क्रमांक देवरे अनिल अशोक, व्दितीय क्रमांक शिरसाठ गायत्री तर तृतीय क्रमांक भारती रविना यांनी पटकावला.

तसेच दिनांक २३/०१/२०१८ रोजी महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांसाठी **भारतीय संविधान संस्कार विचार परिक्षा-२०१८** चे आयोजन करण्यात आले होते. सदर परिक्षा ही वस्तुनिष्ट स्वरुपाची असुन यात भारतीय राज्यघटना या विषयावर आधारीत प्रश्न होते. सदर परिक्षेत प्रथम क्रमांक बी.एस.डब्ल्यू. व्दितीय वर्षातील विद्यार्थी पंकज राठोड, व्दितीय क्रमांक एम.एस.डब्ल्यू. व्दितीय वर्षातील विद्यार्थी वाघ गौतम तर तृतीय क्रमांक बी.एस.डब्ल्यू. तृतीय वर्षातील विद्यार्थीनी कु. सोळुंके दुर्गा हीने पटकावला.

भारतीय संविधान वाचन सप्ताह कार्यक्रमाचा समारोप दि. २६/०१/२०१८ रोजी आयोजित करण्यात आला होता. दरवर्षी सदर महाविद्यालयात संविधान वाचन सप्ताह आयोजित केला जातो. सर्व विद्यार्थ्यांना संविधानाविषयी तसेच आपल्या मुलभूत अधिकारांविषयी माहिती होते. तसेच सप्ताहातील प्रत्येक दिवशी पोस्टर प्रदर्शन, घोषवाक्य, पथनाट्य, वर्क्तृत्व स्पर्धा, भारतीय संविधान संस्कार विचार परिक्षा-२०१८ अशा वेगवेगळ्या स्पर्धांचे अयोजन करण्यात आले होते, महाविद्यालयाचा हा नाविण्यपुर्ण

उपक्रम आहे त्यामुळे अशा प्रकारचा उपक्रम दरवर्षी आयोजित व्हावा, असे मनोगत भारतीय संविधान वाचन सप्ताहाबद्दल विद्यार्थ्यांनी व्यक्त केले. सर्व विजेत्या विद्यार्थ्यांना मिळालेल्या यशाबद्दल **रोख स्वरुपात बक्षिस व प्रमाणपत्र** देण्यात आले. आपल्या अध्यक्षीय भाषणात महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. जालिंदर अडसुळे यांनी २६ जानेवारी प्रजासत्ताक दिनाचे महत्व सांगितले आणि भारतीय संविधानाबद्दलही आपले मनोगत व्यक्त करतांना सांगितले की, सदरच्या उपक्रमात विद्यार्थ्यांना नविन ऊर्जा मिळाली आहे. या सप्ताहाअंतर्गत त्यांना भारतीय संविधानातील महत्वपुर्ण सर्वच कलमांचे ज्ञान अवगत झाले असेलच असे मला वाटते.

सदरील कार्यक्रमाचे सुत्रसंचालन वनश्री बैसाणे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी होण्याकरीता ग्रंथपाल श्री.गजेंद्र जगदेव व ग्रंथालयातील कर्मचारी श्री.सुभाष बागुल, श्री. विजय आगळे, श्री. विशाल भदाणे, श्री.सुधिर पाटील, श्रीमती आम्रपाली सुर्यवंशी, श्री. मनोज ठाकरे यांनी सहकार्य केले. तसेच सदरील कार्यक्रमात महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारीवृंद आणि विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली. सर्व उपस्थितांचे व मान्यवरांचे आभार मानुन कार्यक्रम संपन्न झाला.

LIBRARIAN,
ग्रंथपाल
Dr. Babasaheb Ambedkar College of Social Work, Morane (Nakane) Tal. Dist. Dhule.

Dr. Babasaheb Ambedkar College of Social Work, Morane Dhule (M.S.) Samata Shikshan Sanstha, Pune's

DR.JALINDAR ADSULE
प्राचार्य
PRINCIPAL
Samata Shikshan Sanstha,Pune's
Dr.Babasaheb Ambedkar College of Social Works,Morane(Nakane)
Tal. & Dist.Dhule (M.S.) - 42400

Samata Shikshan Sanstha Pune-30
Dr.Babasaheb Ambedkar College of Social Work,Morane
Tal.Dist.Dhule424002

---

Indian Constitution Reading Weekly Program Photo 2017-18

कार्यक्रमाचे उद्घाटक मा.आमदार कुणालजी पाटील व इतर मान्यवर.



ग्रंथपाल. भारतीय संविधान कार्यक्रमाचे प्रास्ताविक करतांना.



Dr.Babasaheb Ambedkar College of Social Work,Morane,Dhule (M.S.) ★ Samata Shikshan Sanstha, Pune's

DR.JALINDAR ADSULE
PRINCIPAL
Samata Shikshan Sanstha,Pune's
Dr.Babasaheb Ambedkar College of
Social Works,Morane(Nakane)
Tal. & Dist.Dhule (M.S.) - 42400

मा. प्रा. डॉ. सतिश म्हस्के सर मार्गदर्शन करतांना.



उपस्थित सर्व विद्यार्थी व कर्मचारीवर्ग.



Dr.Babasaheb Ambedkar College of Social Work, Morane Dhule
Samata Shikshan Sanstha, Pune's
(S.W.)

DR.JALINDAR ADSULE
PRINCIPAL
Samata Shikshan Sanstha,Pune's
Dr.Babasaheb Ambedkar College of Social Works,Morane(Nakane)
Tal. & Dist.Dhule(M.S.) - 42400

समता शिक्षण संस्था, पुणे संचलित

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजकार्य महाविद्यालय, मोराणे (नकाणे) ता.जि.धुळे



---

### "भारतीय संविधान वाचन सप्ताह "कार्यक्रम

### अहवाल (२०१८-१९)

समता शिक्षण संस्था, पुणे संचलित, डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजकार्य महाविद्यालय, मोराणे ता.जि. धुळे येथे दिनांक २१/०१/२०१९ ते २६/०१/२०१९ या कालावधित "भारतीय संविधान वाचन" सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. दिनांक २१/०१/२०१९ रोजी भारतीय संविधान वाचन सप्तहाच्या उद्घाटन कार्यक्रमाला प्रमुख उद्घाटक म्हणुन ॲड. भुषण महेश भामरे व मा. श्री. महेश भटू भामरे हे उपस्थित होते. तर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जालिंदर अडसुळे हे कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी विराजमान होते. कार्यक्रमाचे उद्घाटन ॲड. भुषण महेश भामरे , प्राचार्य डॉ.जालिंदर अडसुळे सर, ग्रंथपाल गजेंद्र जगदेव व मंचावरील उपस्थित इतर मान्यवर यांच्याहस्ते डॉ.बाबसाहेबांच्या प्रतिमेचे पुजन करुन व संविधानाची उद्देशिका वाचुन भारतीय संविधान वाचन सप्ताहाचे उद्घाटन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रा. गजेंद्र जगदेव यांनी प्रास्तविक केले, २००८ पासुन भारतीय संविधान वाचन सप्ताह कार्यक्रमाची सुरुवात महाविद्यालयात सुरु केली आहे. भारतीय संविधानाविषयी जाणीव जागृती व बांधिलकी निर्माण व्हावी असा मुख्य उद्देश या सप्ताहाचा आहे. तसेच पुर्ण सप्ताहात विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. त्यात पोस्टर प्रदर्शन करणे, पथनाट्य सादर करणे, भारतीय संविधानावर मनोगत व्यक्त करणे, ग्रंथ प्रदर्शन इ. उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे असे त्यांनी आपल्या प्रास्ताविकात मांडले.

त्यानंतर कार्यक्रमाचे उद्घाटक ॲड. भुषण महेश भामरे यांनी आपल्या मार्गदर्शनात असे म्हटले की, डॉ. ए.पी.जे अब्दुल कलाम यांच्यामते आयडियल हे विद्यार्थ्यांकडूनच घ्यावे. तसेच भारतीय संविधानाविषयी बोलतांना ॲड. भामरे म्हणाले की, संविधानाने प्रत्येक व्यक्तीला भाषण करण्याचा अधिकार दिला आहे. धर्मनिरपेक्ष, समाजवादी, लोकशाही इ. बाबी भारतीय राज्यघटनेत महत्वाच्या आहेत. भारतीय संविधान तयार

होण्यासाठी हे २ वर्षे ११ महिने १८ दिवस लागले. त्यानंतर त्यांनी भारतीय संविधानातील कलमांची महत्वपुर्ण माहिती विद्यार्थ्यांना थोडक्यात दिली. तसेच भारतीय राज्यघटनेत राज्यसाठी नितीदर्शक तत्वे, मुलभूत कर्तव्ये देण्यात आली आहेत. खऱ्या अर्थाने भारतीय राज्यघटनेचे पालन व्हायला पाहिजे. राजकीय प्रतिनिधींनाही अशा कार्यक्रमात सहभागी करुन घेतले पाहिजे. समाजकार्य शिक्षण घेणारे विद्यार्थी व इतर शिक्षण घेणारे विद्यार्थ्यी यांमध्ये समाजकार्यातील विद्यार्थ्यांनी संविधानाचे व्यवस्थितरित्या अभ्यास करुन आपल्या गावाचे, समाजाचे, राज्याच्या विकासात सहभाग नोंदवणे खुप गरजेचे आहे.

अध्यक्षिय भाषणात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जालिंदर अडसुळे यानी संविधाना वाचन सप्ताह हा आपल्या महाविद्यालयात ७ दिवसांपर्यंत साजरा केला जातो. भारतीय संविधानाला कुठेतरी धोका पोहचत आहे, भारतीय राज्यघटनेतील काही कलमांचा चुकीचा वापर होत आहे. भारतातील कोणत्याही धर्म, प्रांत, राज्य याला फक्त भारतीय संविधानच वाचवु शकते . लोकशाही प्रक्रीया ही भारतीय राज्यघटनेने आपल्याल दिलेली एक अनमोल देणगी आहे असे मत त्यांनी व्यक्त केले.

दिनांक २२/०१/२०१९ रोजी जिल्हा विधी प्राधिकरण सेवा आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजकार्य महाविद्यालय मोराणे यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत विधी सहाय्य मार्गदर्शन केंद्राचे उद्‌घाटन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी जिल्हासत्र न्यायालय, धुळे येथील मुख्य न्यायाधिश मा. मंगला धोटे, मुख्य अतिथी जिल्हा विधी प्राधिकरण सेवेचे सचिव मा. जे. अे. शेख साहेब, मोराणे प्रभागातील विद्यमान नगरसेवक श्री. किरण अहिरराव, केंद्राच्या महाविद्यालयातील समन्वयक प्रा. रचना अडसुळे व जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांमार्फत नियुक्त केलेले ॲड. सय्यद अब्रार उपस्थित होते.

समाजातील दुर्बल व गरजु घटकांना तसेच ग्रामीण भागातील व्यक्तींना, महिला व बालक, वृध्द अशा कायदेविषयक गरजु घटकांना सदर केंद्रामार्फत मोफत कायेदविषयक सल्ला, मार्गदर्शन व सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्यात येईल. ज्यावेळी समाजातील वंचित व दुर्लक्षित घटकांपर्यंत मोफत विधी सहाय्य केंद्र पोहचेल त्यावेळी या केंद्राचा उद्देश साध्य होईल असे न्यायमुर्ती मा. मंगला धोटे या म्हणाल्या.

कार्यक्रमाचे मुख्य अतिथी जिल्हा विधी प्राधिकरण सेवेचे सचिव मा. जे. अे. शेख साहेब यांनी केंद्राचे महत्व पटवुन देत असतांना त्यांनी असे म्हटले की, मोफत विधी सहाय्य केंद्र हे धुळे जिल्ह्यातील पहिले असे केंद्र आहे की जे गैर विधी महाविद्यालयात सुरु करण्यात आले आहे. सदर केंद्र समाजकार्य महाविद्यालयात सुरु

करण्यामागचे कारण म्हणजे महाविद्यालयाची सामाजिक बांधिलकी तसेच वंचित घटकांपर्यंत पोहचण्याची तळमळ होय. तसेच कार्यक्रमाला मोराणे प्रभागातील विद्यमान नगरसेवक श्री. किरण अहिरराव हे उपस्थित होते व त्यांना सदर कार्यक्रमाला आपल्या शुभेच्छा दिल्या.

दिनांक २३/०१/२०१९ रोजी भारतीय संविधान वाचन सप्ताह कार्यक्रमाच्या निमित्ताने पोस्टर प्रदर्शन घेण्यात आले. यात महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. सदर कार्यक्रमाल परिक्षक म्हणुन प्रा. डॉ. सुदाम राठोड उपस्थित होते. या पोस्टर प्रदर्शनात प्रथम क्रमांक विजय मांगू ठाकरे, व्दितीय क्रमांक अपेक्षा दादाराव सोनवणे तर तृतीय क्रमांक गणेश सुनिल ऊफाडे यांनी मिळवले.

दिनांक २५/०१/२०१९ रोजी भारतीय संविधान वाचन सप्ताह कार्यक्रमाच्या निमित्ताने ***अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि सोशिअल मिडीया*** या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शक म्हणुन स्वंतत्र भारत दैनिकाचे वृत्त संपादक श्री. प्रविण खरे हे उपस्थित होते. कार्यक्रमाला श्री. प्रविण खरे, प्राचार्य डॉ.जालिंदर अडसुळे सर, श्री. बागुल सुभाष व महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी आणि महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते श्री. प्रविण खरे यांनी आपल्या मार्गदर्शनात असे म्हटले की, अभिव्यक्ती स्वातंत्र्य हा घटनेने दिलेला मुलभूत अधिकार आहे. या अधिकारामुळे समाजातील महिला, कामगार, अपंग व्यक्ती, शोषित घटक इ. सर्वांना आपले मत व्यक्त करण्याचा अधिकार मिळतो. पुढे ते विद्यार्थ्यांना संबोधुन असे म्हणाले की, सद्याच्या काळात सोशिअल मिडीयाचा म्हणजेच whatsapp, Facebook, Twitter यांचा अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या नावाने सर्रास वापर होत आहे. पण असे करत असतांना काही मर्यादांचे पालन करणे आवश्यक आहे जसे काहीही माहिती प्रदर्शित करत असतांना कोणत्याही विशिष्ट समुह, धर्म, जात, राष्ट्र यांच्या विरोधात अक्षेपार्ह व्यक्तव्य होत नाही ना याची जाणीव ठेवावी. शेवटी श्री. खरे यांनी अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा भविष्यात सकारात्मक वापर करावा व देशहितासाठी कार्य करावे असे सांगितले.

दिनांक २६/०१/२०१९ रोजी समता शिक्षण संस्था, पुणे संचलित डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजकार्य महाविद्यालय व भागाबाई आनंदा वाघ विजाभज आश्रमशाळा यांच्य संयुक्त विद्यामाने प्रजासत्ताक दिन व भारतीय संविधान वाचन सप्ताह समारोप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या दिवशी भारतीय संविधान वाचन सप्ताह निमित्ताने संविधानपर मनोगत व्यक्त करण्यात आले त्यात प्रथम क्रमांक संदिप खांडेकर व व्दितीय

क्रमांक कल्पेश भामरे यांनी पटकावले. तसेच मोराणे गावातील लोकांना संविधानाबद्दल जाणीव जागृती व्हावे यासाठी महाविद्यालयाने गावात ग्रंथ प्रदर्शान व पथनाट्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला समता शिक्षण संस्थेचे सेक्रेटरी प्रा. विलास वाघ, प्राचार्य डॉ.जालिंदर अडसुळे, प्रमुख पाहुणे श्री. प्रकाश जावळे, श्री. विनोद शहारे तसेच आश्रमशाळेचे कर्मचारी, महाविद्यालयाचे शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी महाविद्यालयातील सहभागी विद्यार्थ्यांनी आपले पथनाट्य सादर केले हे पथनाट्य पहायला गावातील वृध्द, तरुण, तसेच महिला वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. सदर पथनाट्य स्पर्धेत प्रथम क्रमांक सुनिल बहिरम याच्या ग्रुपने तर व्दितीय क्रमांक दुर्गा सोलुंके यांच्या ग्रुपने पटकावले.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी ग्रंथपाल गजेंद्र जगदेव तसेच ग्राथालय कर्मचारी श्री. सुभाष बागुल, श्री. विजय आगळे व श्री.विशाल भदाणे यांनी प्रयत्न केले.

ग्रंथपाल
गजेंद्र जगदेव

LIBRARIAN,
Dr. Babasaheb Ambedkar College of Social Work, Morane (Nakane) Tal. Dist. Dhule.

Samata Shikshan Sanstha, Pune's
Dr.Babasaheb Ambedkar College of Social Work, Morane, Dhule (M.S.)

DR.JALINDAR ADSULE
PRINCIPAL
Samata Shikshan Sanstha,Pune's
Dr.Babasaheb Ambedkar College of Social Works,Morane(Nakane)
Tal. & Dist.Dhule (M.S.) - 42400

Samata Shikshan Sanstha Pune-30
Dr.Babasaheb Ambedkar College of Social Work,Morane
Tal.Dist.Dhule424002

Indian Constitution Reading Weekly Program Photo 2018-19

Principal Dr.J.B.Adsule Sir, Ad.Bhushan Bhamare Sir






College of Social Work, Morane
Samata Shikshan Sanstha, Pune's

DR.JALINDAR ADSULE
PRINCIPAL
Samata Shikshan Sanstha,Pune's
Dr.Babasaheb Ambedkar College of
Social ... s,Morane(Nakane)
Tal ... ule (M.S.)

Indian Constitution Reading Weekly Program
Lecturer Delivered by Mr.Pravin Khare Sir



**DR.JALINDAR ADSULE**
**PRINCIPAL**
Samata Shikshan Sanstha,Pune's
Dr.Babasaheb Ambedkar College of Social Works,Morane(Nakane)
Tal. & Dist.Dhule (M.S.) - 42400

Samata Shikshan Sanstha, Pune's
Dr.Babasaheb Ambedkar College of Social Work,Morane,Dhule (M.S.)

समता शिक्षण संस्था, पुणे-३०



# डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजकार्य महाविद्यालय, मोराणे (नकाणे)

ता. जि. धुळे

---

## अहवाल (२०१९-२०)

### भारतीय संविधान वाचन सप्ताह कार्यक्रम

समता शिक्षण संस्था, पुणे संचलित, डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजकार्य महाविद्यालय, मोराणे ता.जि. धुळे येथे दिनांक २०/०१/२०२० ते२६/०१/२०२० या कालावधित "भारतीय संविधान वाचन" सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाला प्रमुख उद्घाटक म्हणुन धुळे ग्रामीण मतदार संघाचे माजी आमदार मा. प्रा.शरद पाटील हे उपस्थित होते. तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालय, देवपूर येथील उपप्राचार्य प्रा.डॉ. साजदि शेख हे प्रमुख मार्गदर्शक म्हणुन उपस्थित होते. तर महाविद्यालयाचे प्रा. गोपाळ निंबाळकर हे कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे उद्घाटन माजी आमदार मा.प्रा.शरद पाटील, प्रमुख मार्गदर्शक प्रा. डॉ. साजिदा शेख, प्रा.गोपाळ निंबाळकर सर व मंचावरील उपस्थित प्रा.डॉ.सुदाम राठोड, इतर मान्यवर यांच्याहस्ते डॉ.बाबसाहेबांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले. त्यानंतर भारतीय संविधान वाचन सप्ताहाचे उद्घाटन संविधानाची उद्देशिका वाचुन माजी आमदार मा.प्रा.शरद पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रा. गजेंद्र जगदेव यांनी प्रास्तविक केले, त्यात त्यांनी भारतीय संविधान वाचन सप्ताहाचे कार्यक्रमाचे नियोजनाविषयी माहिती विद्यार्थ्यांना दिली. त्यानिमित्ताने पुर्ण सप्ताहात विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून त्यात पोस्टर प्रदर्शन करणे, पथनाट्य सादर करणे, भारतीय संविधान परिक्षा-२०२० इ. उपक्रमांचे आयोजन करण्यात आले असे त्यांनी आपल्या प्रास्ताविकात मांडले.

त्यानंतर कार्यक्रमाचे उद्घाटक माजी आमदार मा. प्रा.शरद पाटील यांनी आपल्या मार्गदर्शनात असे म्हटले की, खऱ्या अर्थाने भारतीय राज्यघटनेचे पालन व्हायला पाहिजे. राजकीय प्रतिनिधींनाही अशा कार्यक्रमात सहभागी करुन घेतले जात आहे.ही फार महत्वाची बाब आहे. समजकार्य महाविद्यालयाचे विद्यार्थी हे समाजाशी खुप निगडीत असतात. कारण त्यांचा प्रत्यक्ष लोकांशी संपर्क येतो. भारतीय संविधान हा राष्टीय ग्रंथ असून तो प्रत्येक युवकांनी व तरूणानी वाचन करणे काळाची गरजच आहे. तरच ते समाजामध्ये संविधानाबददल जाणीव जागृती करु शकतील. असे त्यांनी आपले मनोगत व्यक्त करतांना सांगितले. म.गांधी, व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य हे आपल्या देशासाठी उपयुक्तच आहे.त्यांचा विचारांचा अभ्यास केला पाहिजे. आपल्या महाविद्यालयात भारतीय संविधान वाचन सप्ताह हा उपक्रम सर्वोत्तम आहे. स्वातंत्र्य लढा हा महात्मा गांधीनी अहिंसा मार्गाने दिला. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांवर पाश्चामात्य देशांती तज्ञ विचारकांचा प्रभाव होता.कारण त्यांनी परदेशात शिक्षण घेतल्यामुळे त्यांची बुध्दीमत्ता महान होती.आपल्या देशातील गरीबी व दारिद्रय त्यांनी अनुभवले होती. गरीबीचे चटके

सहन केले होते. म्हणनूच त्यांनी भारतीय संविधान निमिती करतांना सर्वच थरातील लोकांचा विचार करून संविधानात सर्वांना समान हक्क व न्याय मिळेल.याची तरतुद केली आहे. भारतीय राज्यघटनेचे पालन व अंमलबजावणी पारदर्शक होणे आवश्यक आहे. भारतीय संविधानाला एक उद्देशपत्रिका जोडली गेलेली आहे. भारताचे सार्वभौम निर्माण होईल. याला समता, न्याय, बंधुता, स्वातंत्र्य या चार घटकांची जोड उद्देशपत्रिकेला आहे. स्वातंत्र्याचा अर्थ विचारांचे स्वातंत्र्य होय. जे मला वाटते, ते मला व्यक्त करता आले पाहिजे. स्त्री पुरुष असा भेदभाव कमी झाला पाहिजे जे-जे मला करता येईल ते मी केले पाहिजे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी एका घटकावर काम केले नाही तर त्यांनी प्रत्येक मानव जातीतील घटकांचा विचार करुन कार्य केलेआहे. तसेच त्यांनी शेतकरी, कामगार, दलित, आदिवासी तसेच समाजातील ओ.बी.सी. वर्ग अशा विविध घटकांवर कार्य केले.

कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक प्रा.डॉ. साजिदा शेख यांनी असे म्हटले की, भारतीय संविधान वाचन सप्ताह प्रत्येक महाविद्यालयात साजरा करणे आवश्यक आहे. राष्ट्रगीत व राष्ट्र ध्वज यांचा आपण सर्व नागरिकांनी सन्मान केला पाहिजे. हे पहिले आपले कर्तव्य आहे.आपल्या देशाच्या संपत्तीचे संरक्षण केले पाहिजे.राष्ट्र ध्वज तिरंगा आपल्या देशाचे सत्याचे प्रतिक आहे.आपण नेहमीच आदर केला पाहिजे. त्याचप्रमाणे आपल्या भारत देशातील प परदेशातील सर्वच महिलांचा आदर व सन्मान केला पाहिजे. संविधानाची मुळ एकप्रत ही जयकर ग्रंथालय पुणे येथे उपल्बध आहे.आपली कर्तव्ये व जबाबदरी काय आहेत या संदर्भातत्यांनी मार्गदर्शन केले.

अध्यक्षिय भाषणात महाविद्यालयाचे प्रा. गोपाळ निंबाळकर यांनी  भारतीय राज्यघटनेचे वैशिष्ट्ये, मुलभुत हक्क, मार्गदर्शक तत्वे समजवुन सांगितले पाहिजे. भारतीय राज्यघटना सर्व सामान्य लोकांपर्यत व समाजातील लोकांपर्यंत पोहचवणे महत्वाचे आहे. असे त्यांनी आपल्या मार्गदर्शनात सांगितले.सदरील कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रतिभा मोरे विद्यार्थ्यानीने केले, व आभार मानले. सदर कार्यक्रमास महाविद्यालयाचे ग्रंथपाल, शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी वर्ग मोठयासंख्येनेउपस्थित होते.

## प्रत्येक नागरिकाने भारतीय संविधानाचा आदर केला पाहिजे.

- प्रा.राजीव आरके

समता शिक्षण संस्था, पुणे संचलित, डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजकार्य महाविद्यालय, मोराणे ता.जि. धुळे येथे दिनांक २०/०१/२०२० ते२६/०१/२०२० या कालावधित "भारतीय संविधान वाचन" सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटन धुळे ग्रामीण मतदार संघाचे माजी आमदार मा. प्रा.शरद पाटील यांच्या हस्ते करण्यात आले होते. दिनांक २१/०१/२०२० रोजी महाविद्यालयाचे प्रा.डॉ. दिलीप घोंगडे सर अध्यक्ष स्थानी उपस्थित होते.प्रा.राजीव आर के सर हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून दपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रा.डॉ. दिलीप घोंगडे सर व.प्रा.राजीव आर के सर हे प्रमुख मार्गदर्शक ,प्रा. गोपाळ निंबाळकर व मान्यवर यांच्याहस्ते डॉ.बाबसाहेबांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले. त्यानंतर प्रा.डॉ. दिलीप घोंगडे सर अध्यक्ष यांचे स्वागत किशोर बैसाणे यांना केले. .प्रा.राजीव आर के सर प्रमुख मार्गदर्शक यांचे स्वागत प्रा.डॉ. दिलीप घोंगडे यांनी केले.तसेच ,प्रा. गोपाळ निंबाळकरयांचे स्वागत रामलाल राठोड याने केले.वग्रंथपाल जगदेव यांचे स्वागत भास्कर गांगुर्डे याने केले.

त्यानंतर सुरूवातीला कु. अस्मिता वानखेडे,कुहेमांडे सुजाता,कु राजेश्वरी मोरे व इतर विद्यार्थ्यांनी भारतीय संविधानाचे वाचन केले.कार्यक्रमाच्या सुरुवातीला महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रा. गजेंद्र जगदेव यांनी प्रास्तविक केले,

त्यानंतर कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक प्रा.राजीव आर के सर यांनी आपल्या मार्गदर्शनात असे म्हटले की, ३९५ कलमांचा सार हा भारतीय संविधानच्या प्रास्ताविकेमधून दिसून येतो.प्रत्येकाने संविणानाचा अर्थ समजून घेतला पाहिजे.संविधानाबददल आज अनेक गैरसमज केले जात आहेत.त्यामुळे प्रत्येक संविधनातील कलमांचा अभ्यास केला पाहिजे

सार्वभौम,समाजवाद,धर्मनिरपेक्ष,लोकशही,न्याय,समता,स्वातंत्र्य, अभ्वियक्ती आणि व्यक्तीची प्रतिष्ठा व बंधुता यांचा अर्थ समजून सांगितला. अध्यक्षिय भाषणात महाविद्यालयाचे प्रा. दिलीप घोंगडे यांनीं भारतीय राज्यघटनेबददल जाणीव जागृती व्हावी,संविधानीक मुल्यांची देनदिन जीवनामध्ये जोपासना करावी.सर्व धर्मांचा आदरकरावा.आपले राष्ट हे धर्मनिरपेक्ष आहे.सर्वांना समान स्थान स्ंविधानाने दिले आहे. तसेच वंचित घटकांवर अन्याय अत्याचार खुप प्रमाणात वाढत आहेत. त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी सर्वांनी प्रयत्न केले पाहिजेत असे त्यांनी आपल्या मार्गदर्शनात सांगितले.

सदरील कार्यक्रमाचे सुत्रसंचालन बागले विकेश विद्यार्थ्यांनीने केले, व आभार मानले. सदर कार्यक्रमास महाविद्यालयाचे ग्रंथपाल, शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी वर्ग मोठया संख्येनेउपस्थित होते.

दिनांक २५/०१/२०२० रोजी महाविद्यालयातर्फे महिला सक्षमीकरणाचे कायदे विषयक समुपदेशन कार्यशाळा घेण्यात आली या कार्यशाळेस विद्यार्थ्यांनी मोठया प्रमाणात सहभाग नोंदविला.

**२६ जानेवारी प्रजासत्ताक दिन साजरा व भारतीय संविधान वाचन सप्ताह कार्यक्रमाचा समारोप**

दिनांक २६/०१/२०२० रोजी प्राथिमक आश्रम शाळा मोराणे आणि समता शिक्षण संस्था, पुणे संचलित, डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजकार्य महाविद्यालय, मोराणे यांच्या संयुक्त विद्यमाने प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला होता.

प्रथम ध्वजारोहणाचा कार्यकम समता शिक्षण संस्थेचे सेक्रेटरी मा. प्रा. विलास वाघ साहेब यांच्या हस्ते करण्यात आला.या कार्यक्रमास समता शिक्षण संस्थेच्या नुतन अध्यक्षा मा.प्रा.उषा वाघ मॅडम,उपस्थित होत्या. तसेच पु.ना.गाडगीळ ज्वेलर्स  धुळे येथील कर्मचारी प्रतिनिधी तसेच शालेय समितीचे चेअरमन श्री.भाईदास पवार,गावातील ज्येष्ठ नागरीक, आश्रम शाळेचे मुख्यध्यापक श्री.राजेंद्र पाटील आणि महाविद्यालयातील व आश्रमशाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच विद्यार्थी यांच्या उपस्थितीत ध्वजारोहणाचा कार्यक्रम घेण्यात आला. त्यानंतर सर्व उपस्थितांनी    झेंडागीत व राष्ट्रगीत , आणि भारतीय संविधानाची उद्देशिकेचे सामुहीक वाचुन करुन प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. त्यानंतर प्रजासत्ताक दिनानिमीत्ताने शाळेच्या विद्यार्थ्यांनी भाषणे दिलीत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजकार्य महाविद्यालय, मोराणे येथे दि. २०/०१/२०२० ते दि. २६/०१/२०२० या कालावधीत भारतीय संविधान वाचन सप्ताह कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सदरील कार्यक्रमाचा  समारोप कार्यक्रम दि. २६/०१/२०१६ रोजी आयोजित करण्यात आला.होता.महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रा. गजेंद्र जगदेव यांनी  भारतीय संविधान वाचन सप्ताह समारोपप्रसंगी सांगितले.

त्यानंतर प्रजासत्ताक दिनानिमीत्ताने शाळेच्या विद्यार्थ्यांनी भाषणे दिलीत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजकार्य महाविद्यालय, मोराणे येथे दि. २०/०१/२०२० ते दि. २६/०१/२०२० या कालावधीत भारतीय संविधान वाचन सप्ताह कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जालिंदर अडसुळे सर यांच्या मार्गदर्शनाने करण्यात आले होते. भारतीय संविधान वाचन सप्ताहाच्या समारोप प्रसंगी महाविद्यालयातील विद्यार्थी केतन साळवे  यांनी आपले मनोगत व्यक्त केले. त्यानंतरमहाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी पथनाटय सादर केली. तसेच आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांनी देशावर आधरीत गीत गायन ,नृत्य, डान्स इ.कार्यक्रम सादर केलीत.

सदरील कार्यक्रमाचे सुत्रसंचालन बागले मॅडम यांनी केले. कार्यक्रम यशस्वी होण्याकरीता ग्रंथपाल श्री.गजेंद्र जगदेव व ग्रंथालयातील कर्मचारी यांनी सहकार्य केले. तसेच सदरील कार्यक्रमात प्राथमिक आश्रम शाळा मोराणे येथील सर्व शिक्षक व कर्मचारी ,महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारीवृंद आणि विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता सर्व उपस्थितांचे व मान्यवरांच्या उपस्थितीत राष्ट्गीताने करण्यात आली .तसेच सर्व उपस्थितांचे आभार श्री. सी.टी. पाटील यांनी मानले. त्यानंतर पु.ना.गाडगीळ ज्वेलर्स धुळे येथील कर्मचारी प्रतिनिधीनी सर्व विद्यार्थ्यांना पेन्सिल बॉक्स व चॉकलेट वाटप केले. अशा पध्दतीने प्रजासत्ताक दिन व भारतीय संविधान वाचन सप्ताहाचा समारोप कार्यक्रम व्यवस्थिपणे पार पडला.

LIBRARIAN,
Dr. Babasaheb Ambedkar College of Social Work, Morane (Nakane) Tal. Dist. Dhule.

Dr. Babasaheb Ambedkar College of Social Work, Morane, Dhule (M.S.) Samata Shikshan Sanstha, Pune's

DR.JALINDAR ADSULE
PRINCIPAL
Samata Shikshan Sanstha,Pune's
Dr.Babasaheb Ambedkar College of Social Works,Morane(Nakane)
Tal. & Dist.Dhule (M.S.) - 42400

Samata Shikshan Sanstha Pune-30
Dr.Babasaheb Ambedkar College of Social Work,Morane
Tal.Dist.Dhule424002

---

## Indian Constitution Reading Weekly Program Photo 2019-20

Prof .Sharad Patil ,Dr.Sudam Rathod, Prof.Gopal Nimbalkar ,Dr.Sajida Shaikh,Prof.Gajendra Jagdeo



Indian Constitution Program Present Students & College Staff.

Dr. Babasaheb Ambedkar College of Social Work, Morane, Dhule (M.S.) Samata Shikshan Sanstha, Pune's

**DR.JALINDAR ADSULE**
**PRINCIPAL**
Samata Shikshan Sanstha,Pune's
Dr.Babasaheb Ambedkar College of
Social Works,Morane(Nakane)
Tal. & Dist.Dhule (M.S.) - 42400

महाविद्यालयाचे सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी.



मार्गदर्शन करतांना प्रा. राजीव आरके सर.



Dr.Babasaheb Ambedkar College of Social Work, Morane, Dhule (M.S.)
Samata Shikshan Sanstha, Pune's

DR.JALINDAR ADSULE
PRINCIPAL
Samata Shikshan Sanstha,Pune's
Dr.Babasaheb Ambedkar College of
Social Works,Morane(Nakane)
Tal. & [illegible] Dhule (M.S.) - [illegible]

महाविद्यालयाचे सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी.



मार्गदर्शन करतांना प्रा. राजीव आरके सर.



Samata Shikshan Sanstha, Pune's
Dr.Babasaheb Ambedkar College of Social Work, Morane, Dhule (M.S.)

DR.JALINDAR ADSULE
PRINCIPAL
Samata Shikshan Sanstha,Pune's
Dr.Babasaheb Ambedkar College of
Social Works,Morane(Nakane)
Tal. & [illegible] Dhule (M.S.) - 42[illegible]

समता शिक्षण संस्था, पुणे

डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाजकार्य महाविद्यालय, मोराणे, धुळे

# राष्ट्रीय सेवा योजना

## २०१९-२०

## भारतीय संविधान दिन

दि.२६ नोव्हेंबर २०१९ रोजी भारतीय संविधान दिनानिमित्त महाविदयालयात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सर्व प्रथम कार्यक्रमाचे अध्यक्ष मा.प्राचार्य डॉ.जे.बी.अडसुळे सर यांच्या हस्ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय संविधान प्रास्ताविकतेच्या प्रतिमाचे पुजन केल्यानंतर सामुहिकरित्या प्रास्ताविकेचे वाचन करण्यात आले. त्यानंतर महाविद्यालयातील विद्यार्थीनींनी संविधान विषयी आपली मते मांडली. तसेच महाविद्यालयातील प्रा.डॉ.रघुनाथ महाजन यांनी प्रास्ताविकेतील संकल्पनाविषयी मनोगत व्यक्त केले. तर अध्यक्षीय समारोप प्रसंगी प्राचार्य डॉ.जालिंदर अडसुळे यांनी संविधानातील मार्गदर्शक तत्वांवर प्रकाश टाकला.

कार्यक्रम अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना
डॉ.बा.आं.स.महा., मोराणे, धुळे.

Samata Shikshan Sanstha, Pune's
Dr. Babasaheb Ambedkar College of Social Work, Morane Dhule (M.S.)

DR.JALINDAR ADSULE
PRINCIPAL
Samata Shikshan Sanstha,Pune's
Dr.Babasaheb Ambedkar College of Social Works,Morane(Nakane)
Tal. & Dist.Dhule (M.S.) - 42400

SAMATA SHIKSHAN SANSTHA, PUNE'S

# Dr. Babasaheb Ambedkar College of Social Work

Morane (Nakane) Tal. & Dist. Dhule. (M.S.) 424002

Phone : 9405887289

NAAC Accredited 'B' Grade With CGPA - 2.52 (June 25, 2015 to June 24, 2020)

E-Mail:-msw_college@rediffmail.com / Web. www.drbacsw.org

| CHAIRMAN | SECRETARY | PRINCIPAL |
| --- | --- | --- |
| Adv. M. A. Wagh | Prof. Vilas Wagh | Dr. Jalindar Adsule |


Outward No: 259/msw/2019 Date: दि. २६/११/२०१९

## २६ नोव्हेंबरभारतीय संविधान दिन' अहवाल

समता शिक्षण संस्था, पुणे - ३० संचलित डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजकार्य महाविद्यालय, मोराणे (प्र.ल.) ता. जि. धुळे येथे महाराष्ट्र शासन , शिक्षण संचालनालय , (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्यमध्यवर्ती इमारत,पुणे-४११००१ यांचे पत्र आपले पत्र क्र. जा.क.उशिसं/मवि-१/संविधानदिन/परिपत्रक/२०१९/संविधान कार्यक्रम दिनांक ०७/११/२०१९ रोजीच्या पत्रानूसार महाविद्यालयात **भारतीय संविधान दिन २६ नोव्हेंबर २०१९** रोजी कार्यक्रम ाचे आयोजन करण्यात आले होते .

या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जालिंदर अडसुळे उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जालिंदर अडसुळे यांच्या हस्ते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन भारतीय संविधान प्रास्ताविकेच्या प्रतिमेचे पुजन करण्यात येवून ,बाबासाहेबांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. त्याचबरोबर भारतीय संविधान प्रास्ताविकेच्या प्रतिमेचे पूजन महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी , शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्रा.गोपाळ निंबाळकर यांनी केले. 'भारतीय संविधान दिन' २६ नोव्हेंबर २०१९ रोजी महाराष्ट्र शासनाने संविधान दिन साजरा करण्यासंबंधी निर्देश दिले आहेत असे सांगितले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला कु. अस्मिता वानखेडे हया विद्यार्थीनीने भारताचे संविधान प्रास्ताविकेचे वाचन केले. त्यानंतर सामुहिक प्रास्ताविकेचे वाचन सर्व विद्यार्थी शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी केले.

संरूवातीला महाविद्यालयातील विद्यार्थीनी कु.कोमल नगराळे,कु.सुजाता हेमबांडे ,कु.ऐश्वर्या मोरे व कु.अस्मिता वानखेडे या विद्यार्थीनीनी २६ नोव्हेंबर संविधान दिन' या निमित्ताने आपली मते मांडली.

महाविद्यालयाचे प्रा.डॉ.रघुनाथ महाजन यांनी आपले मनोगत व्यक्त करतोना सांगितने की, राष्ट्राचे सार्वभौम, व्यक्तींचे स्वातंत्र्य समता, बंधुता आणि प्रजासत्ताक राज्यपध्दती हा संविधानाचा महत्वपुर्ण पाया आहे. समाजवादी, धर्मनिरपेक्ष

गणराज्य घडविण्याचा संकल्प या प्रास्ताविकेत मांडला आहे. सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय राज्यातील सर्व नागरिकांना देण्याचे अभिवचन, तसेच सर्व नागरिकांना विचार, अभिव्यक्ती, विश्वास श्रध्दा व उपासना यांचे स्वातंत्र्य आपल्या भारतीय राज्यघटनेत बहाल करण्यात आले आहे. असे आपल्या मनोगतामध्ये प्रा.डॉ.रघुनाथ महाजन सर यांनी मांडले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जालिंदर अडसुळे सरांनी महाविद्यालयातील विद्यार्थी व सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना भारतीय संविधानाबद्दल जाणीव जागृतीपर मार्गदर्शन केले. त्यांनी आपल्या मार्गदर्शनात भारतीय संविधानात नमुद करण्यात आलेल्या सर्व मार्गदर्शक तत्वांबद्दल माहिती दिली. भारतीय राज्यघटना तयार करण्यामध्ये डॉ.बाबासाहेबांची महत्वाची भूमिका होती. असे आपल्या मनोगतामध्ये प्राचार्य डॉ. जालिंदर अडसुळे सर यांनी व्यक्त केले.

महाविद्यालयातील राष्टीय सेवा योजना व ग्रंथालयातर्फे विद्यार्थ्याकरीता भारतीय संविधान वाचन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यात उत्स्फुर्तपणे विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदविला आहे. सदर कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

सर्व उपस्थित विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे आभार कु.तेजश्री भामरेयांनी मानले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.

सदरचा अहवाल छायाचित्रासह सुपुर्द करीत आहोत. कृपया स्वीकार व्हावे ही विनंती.

आपला विश्वासू

Principal
Dr.Babasaheb Ambedkar College Of Social Work
Morane(Nakane),Tal.&Dist.Dhule



भारतीय संविधान उद्देशपत्रिकेचे वाचन करताना विद्यार्थी, प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचारी



भारतीय संविधान दिनाच्या कार्यक्रमाप्रसंगी प्रतिमापूजन करताना मा. डॉ. अडसुळे सर आणि डॉ.

**DR.JALINDAR ADSULE**
**PRINCIPAL**
Samata Shikshan Sanstha,Pune's
Dr.Babasaheb Ambedkar College of
Social Works,Morane(Nakane)
Tal. & Dist.Dhule (M.S.) - 42400

Dr.Babasaheb Ambedkar College of Social Work, Morane Dhule (M.S.) * Samata Shikshan Sanstha, Pune's




भारतीय संविधान दिनानिमित्त मार्गदर्शन करताना
रासेयो स्वयंसेवक अस्मिता वाकडे




प्रा. डॉ. महाजन भारतीय संविधान दिनानिमित्त भाषण
देतांना

Dr.Babasaheb Ambedkar College of Social Work Morane Dhule (M.S.) ★ Samata Shikshan Sanstha, Pune's

**DR.JALINDAR ADSULE**
**PRINCIPAL**
Samata Shikshan Sanstha,Pune's
Dr.Babasaheb Ambedkar College of
Social Works,Morane(Nakane)
Tal. & Dist.Dhule (M.S.) - 42400

समता शिक्षण संस्था, पुणे

डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाजकार्य महाविद्यालय,मोराणे धुळे

---

# राष्ट्रीय सेवा योजना

## २०१८-१९

## संविधान दिवस

२६ नोव्हेंबर हा भारतीय संविधान स्वीकृतीचा दिवस म्हणून साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात संविधान प्रास्ताविकेचे सामुहिक वाचन करण्यात आले. तसेच यावेळी भारतीय संविधानाची वैशिष्टये आणि प्रास्ताविकेमधील महत्वपूर्ण बाबी विषयी प्रा.रघुनाथ महाजन, प्रा.दिलीप घोंगडे यांनी मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.जालिंदर अडसुळे सर होते.

कार्यक्रम अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना
डॉ.बा.आं.स.महा.,मोराणे,धुळे.

Samata Shikshan Sanstha, Pune's
Dr.Babasaheb Ambedkar College of Social Work,Morane,Dhule (M.S.)

DR.JALINDAR ADSULE
PRINCIPAL
Samata Shikshan Sanstha,Pune's
Dr.Babasaheb Ambedkar College of Social Works,Morane(Nakane)
Tal. & Dist.Dhule (M.S.) - 42400

समता शिक्षण संस्था, पुणे

डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाजकार्य महाविद्यालय, मोराणे, धुळे

---

# राष्ट्रीय सेवा योजना

## २०१६-१७

## भारतीय संविधान दिन

दि. २६/११/२०१६ रोजी संविधान दिवस कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले . या कार्यक्रमास नेहरु युवा केंद्राचे प्रमुख मा.अतुल निकम तसेच समाजकल्याण विभागाचे श्रीमती. बागुल मॅडम उपस्थित होते.

मा.अतुल निकम यांनी सविधानाच्या अनुषंगाने हक्क व कर्तव्याची माहिती दिली. ते म्हणाले की, संविधान हे आपल्या लोकशाहीचा आत्मा असून त्याचे आपण पावित्र्य राखले पाहिजे आणि संविधानाचे अधिकार नागरिकांना दिले आहेत. ते पाळतांना आपल्या कर्तव्याची जाणीव ठेवली पाहिजे यावेळी विचारपठावर प्रा.गोपाळ निंबाळकर, प्रा.आर.एस.महाजन, प्रा.प्रमोद भुंबे इ. उपस्थित होते.

कार्यक्रम अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना
डॉ.बा.आं.स.महा.,मोराणे,धुळे.

Dr.Babasaheb Ambedkar College of Social Work,Morane,Dhule (M.S.) ★ Samata Shikshan Sanstha, Pune's

DR.JALINDAR ADSULE
PRINCIPAL
Samata Shikshan Sanstha,Pune's
Dr.Babasaheb Ambedkar College of
Social Works,Morane(Nakane)
Tal. & Dist.Dhule (M.S.) - 42400